धामनगांव रेलवे:स्थानीय धामनगांव एजुकेशन सोसाइटी द्वारा संचालित आदर्श कॉलेज में इस वर्ष की भांति इस वर्ष भी बुधवार, 1 सितंबर को अमरावती जिले के धामनगांव रेलवे कस्बे में आदर्श कॉलेज एवं राष्ट्रीय सेवा योजना एवं राष्ट्रीय छात्र सेना द्वारा पौधारोपण कार्यक्रम आयोजित किया गया। इस आशय की शपथ ली। महाराष्ट्र सरकार की माझी वसुंधरा पहल के तहत राष्ट्रीय सेवा योजना और राष्ट्रीय छात्र सेना द्वारा 100 पेड़ लगाने की अवधारणा को लागू किया गया था। इस अवसर पर महाविद्यालय के राष्ट्रीय सेवा योजना एवं राष्ट्रीय छात्र सेना के समस्त विद्यार्थियों के साथसाथ समस्त शिक्षकों एवं शिक्षण स्टाफ ने वृक्षारोपण कर अपनी भागीदारी दिखाई। और वृक्षारोपण और वृक्षों को जीवित रखने का संदेश दिया गया।इस अवसर पर प्रो. श्रीकांत पाटिल सर, राष्ट्रीय सेवा योजना के कार्यक्रम अधिकारी, डॉ. सहायक कार्यक्रम अधिकारी. प्रवीण के., राष्ट्रीय छात्र सेना के अधिकारी, ले. श्री ए.बी.बंद सर, आर.एस.यो. पूर्व कार्यक्रम अधिकारी डॉ. डॉ. नरेंद्र नागपुरे सर, सोंधिया, भावना चावरे आदि मौजूद थे।

आपल्या तालुक्यातील प्रत्येक बातमी
जनसामान्यांचे हक्काचे व्यासपिठ
e-EDITION
साप्ताहिक वऱ्हाड दर्शन
दि. १२ ऑगस्ट २०२१
कार्यालय - मिराई प्रिंटर्स
सहकार नगर, बनोसा-दर्यापूर ४४४८०३
संपादक - रवि एच. नवलकार
9527414139 / 9021677302
Gmail - ravi85nawalkar@gmail.com
मुलगी वाचवा... मुलगी शिकवा....

## आदर्श महाविद्यालयात १५ दिवसीय आत्मरक्षा कराटे प्रशिक्षण शिबिर संपन्न





**धामणगाव रेल्वे तालुका**
**प्रतिनिधी : हिमांशु इंगळे**

विद्यार्थ्यांना शारीरिक व मानसिकरित्या सक्षम व मजबूत बनविण्याच्या उद्देशाने धामणगाव एज्युकेशन सोसायटी संचालित आदर्श महाविद्यालयात शारीरिक शिक्षण व क्रीडा विभाग, सामाजिक दायित्व सेल आणि वाणिज्य विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने पंधरा दिवसीय 'आत्मरक्षा कराटे प्रशिक्षण वर्ग' दिनांक २७ जुलै ते १० ऑगस्ट २०२१ दरम्यान संपन्न झाले. या प्रशिक्षण वर्गात एकूण ४० विद्यार्थी सहभागी झालेत. सदर प्रशिक्षण शिबिरासाठी मुख्य प्रशिक्षक ब्लॅक बेल्ट श्री सचिन मून होते. या शिबिरादरम्यान विद्यार्थी-विद्यार्थिनींना कराटेच्या माध्यमातून शारीरिक दृष्ट्या सक्षम होऊन स्वतःचे रक्षण आपण कशा प्रकारे करू शकतो याचा अभ्यास व सराव घेण्यात आला, जी आज काळाची गरज आहे. स्वस्थ शरीर आणि स्वस्थ मन या दोन्ही गोष्टी विकास पूरक आहेत, त्यामुळे शरीर आणि मन दोन्ही स्वस्थ ठेवण्यासाठी आवश्यक व्यायाम व मेडिटेशन बद्दल विशेष अभ्यास घेण्यात आला. शिबिराची वेळ सकाळी ७ ते ९ होती. १० ऑगस्ट रोजी या शिबिराच्या समापन प्रसंगी आदर्श महाविद्यालयात ची चमू, सावळा व देवगावच्या कराटे चमू च्या प्रशिक्षणार्थींनी विविध मनोरे व कराटेचे सुंदर व प्रभावी सादरीकरण केले. या प्रशिक्षणादरम्यान उत्कृष्ट सादरीकरण करणाऱ्या विद्यार्थ्यांना विशेष पुरस्कार व प्रशस्तीपत्र देऊन त्यांचा गौरव करण्यात आला. या समारोपीय प्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. योगेंद्र गांडोळे यांनी अध्यक्षस्थान भूषवले आणि विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. यावेळी बोधी बुडीकोण कराटे असोसिएशनचे विदर्भ समन्वयक श्री शिलानंद झांबरे, श्री प्रफुल्ल व इतर पदाधिकारी उपस्थित होते. त्याचप्रमाणे लायन्स क्लब एलिट चे सचिव श्री चेतन जी कोठारी व इतर पदाधिकारी तसेच सदस्य यावेळी आवर्जून उपस्थित होते. लायन्स क्लब एलिट द्वारे एकूण सहा विद्यार्थी प्रशिक्षणार्थींना सन्मानचिन्ह देऊन विशेष गौरव करण्यात आला. बोधी बुडोकान कराटे असोसिएशन द्वारे चार विद्यार्थ्यांना मेडल देऊन विशेष कौतुक करण्यात आले. या कार्यक्रमाच्या १५ दिवसीय शिबिराच्या आयोजनात आयोजना साठी डॉ नरेंद्र नागपुरे, शारीरिक शिक्षण संचालक डॉ. माधुरी कोपुलवार, डॉ. अजय चिंचमलातपुरे यांनी विशेष परिश्रम घेतले. या शिबिरासाठी डॉ. आनंद नरांजे, प्रा.अमोल बंड ,डॉ. पुनम गहुकर व वसंत तायडे यांचे विशेष सहकार्य लाभले. आता यांच्यापैकी २८ विद्यार्थी यलो बेल्ट साठी प्रयत्न करणार आहेत.

## आदर्श महाविद्यालय येथे जागतिक तंबाखू सेवन विरोधी दिननिमित्त जागरूकता अभियान

**प्रतिनिधी-१ जून**

**धामणगाव रेल्वे :** संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, संलग्नित धामणगाव एज्युकेशन सोसायटी द्वारा संचालित आदर्श महाविद्यालय धामणगाव रेल्वे येथे जागतिक तंबाखू सेवन विरोधी दिन (No Tabacco Day) जनजागृती अभियान संपन्न झाले.





तंबाखू सेवन आरोग्यासाठी धोकादायक आहे. म्हणून तंबाखू व त्यापासून निर्मीत पदार्थाचे सेवन न करण्यासाठी महाविद्यालयात शपथ घेण्यात आली. यावेळी कोरोनामुळे हा कार्यक्रम आभासी पद्धतीने घेण्यात आला असून कार्यक्रमाचे प्रास्ताविक क्रीडा व खेळ विभाग प्रमुख डॉ कोपुलवार यांनी केले. आभासी पद्धतीने उपस्थिताना महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ योगेंद्रजी गांडोळे यांनी मार्गदर्शन केले. व रा से यो समन्वयक डॉ नागपुरे यांनी तंबाखू सेवन न करण्याची शपथ दिली.या कार्यक्रमात सर्व विद्यार्थी शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारूयांनी आभासी पद्धतीने आपली उपस्थिति दर्शवली.

आपल्या शहरातील प्रत्येक बातमी
॥ श्रीकृष्णम् वंदे जगद्गुरुम् ॥ अध्ययन समाचार — आता रोज रहा अपडेट! — SOCIAL MEDIA EDITION
संपादक : जितेंद्र रोडे
कार्यालय : ब्राम्हणसभा कॉलनी, डॉ. गजभे यांच्या दवाखान्या समोर, लाकुड बाजार, परतवाडा. जि. अमरावती 444 805 | भ्रमणध्वनी : 9422158005 | दुरध्वनी : 07223-222005 | jitendrarode77@gmail.com | Adhayayn Samachar
बुधवार दि.२७ऑक्टोंबर २०२१

## आदर्श महाविद्यालय धा.रेल्वे येथे राष्ट्रीय सेवा योजनेचे उद्घाटन दिन थाटात साजरा
## रा.से.यो. उद्घाटन सोहळ्या निमित्त भव्य कोव्हीड १९ प्रतिबंधात्मक लसीकरण मोहीम

**धा.रेल्वे दि.२७ प्रज्योत पहाडे**

धामणगाव एज्युकेशन सोसायटी हिंदी भाषिक अल्पसंख्यांक शैक्षणिक संस्था द्वारा संचालित आदर्श विज्ञान, ज. भा. कला व बिरला वाणिज्य महाविद्यालयामध्ये राष्ट्रीय सेवा योजनेचा उद्घाटन सोहळा २०२१-२२ २३ ऑक्टोंबर रोजी थाटात पार पडला.



या उद्घाटन सोहळ्यामध्ये अध्यक्ष स्थान महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. वाय. बी. गांडोळे यांनी भूषविले. या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे आणि मार्गदर्शक म्हणून डॉ. आकाश येंडे (एम. डी. कम्युनिटी मेडिसिन) उपस्थित होते. या कार्यक्रमा मध्ये त्यांनी कार्यक्रमाला उपस्थित असलेल्या रा से यो स्वयंसेवकांना कोव्हीड १९ लसीकरणाचे महत्व, कोरोना काळातील कठीण दिवस, राष्ट्रीय सेवा योजनेचे आपल्या सामाजिक जीवनातील महत्व अशा अनेक विषयावर मोलाचे मार्गदर्शन केले.

या उद्घाटन सोहळ्या मध्ये माजी कार्यक्रम अधिकारी डॉ. नरेंद्र नागपुरे व डॉ. एम. वाय. कोपुलवार यांच्या हस्ते पद हस्तांतरण सोहळा पार पाडण्यात आला. या मध्ये कार्यभार प्रा. श्रीकांत पाटील यांच्याकडे रा से यो बिल्ला देऊन सोपविला व सोबतच सहाय्यक कार्यक्रम अधिकारी डॉ. प्रवीण केचे व महिला सहाय्यक कार्यक्रम अधिकारी डॉ. पूनम गहुकर यांना सुद्धा कार्यभार सोपवण्यात आला. या प्रसंगी डॉ. नरेंद्र नागपुरे यांनी आपल्या विशिष्ट शैली मध्ये स्वतः चा ०६ वर्षांचा राष्ट्रीय सेवा योजनेचा कार्यकाळ आणि पुढील रा.से.यो. ची वाटचाल या वर भाषण केले व उपस्थितांना मंत्र मुग्ध केले.

या उद्घाटन सोहळ्याला महाविद्यालयाच्या इतर शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे अध्यक्षीय समारोप प्राचार्य डॉ. वाय. बी. गांडोळे या उद्घाटन सोहळ्याच्या निमित्ताने सर्वप्रथम "स्वच्छता हीच सेवा" या साधुक्ती चा वापर करून महाविद्यालयीन परिसर स्वच्छता अभियान राबवण्यात आले. नंतर कार्यक्रमाच्या उत्तरार्धात राष्ट्रीय सेवा योजना आणि ग्रामीण रुग्णालय धामणगाव रेल्वे यांच्या संयुक्त विद्यमाने शासन नियमानुसार "भव्य कोव्हीड-१९ प्रतिबंधात्मक लसीकरण मोहीम" महाविद्यालयाच्या सर्व शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचारी आणि विद्यार्थ्यांसाठी राबवण्यात आली.

या लसीकरण मोहिमे अंतर्गत महाविद्यालयाच्या ११९ विद्यार्थ्यांचे लसीकरण करण्यात आले सोबतच काही शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी पण आपले लसीकरण करून घेतले. या दरम्यान काही गावकरी मंडळीनी सुद्धा लसीकरण करण्यासाठी या मोहिमे मध्ये सहभाग घेतला. ही लसीकरण मोहीम पूर्णत्वास नेण्यासाठी ग्रामीण रुग्णालय धामणगाव रेल्वे येथील वैद्यकीय चमू आणि रा.से.यो. स्वयंसेवकांनी अथक परिश्रम घेतले.

उद्घाटन सोहळ्याचे व लसीकरण मोहिमेचे संपूर्ण नियोजन रा.से.यो स्वयंसेवकांनी केले. या मध्ये सूत्रसंचालन वैष्णवी राउत व सिमरन तुळसकर यांनी केले, प्रमुख पाहुण्यांचा परिचय नव नियुक्त सहा. कार्यक्रम अधिकारी डॉ. प्रवीण केचे यांनी केले व शेवटी आभार प्रदर्शन अथर्व गावंडे याने केले. चंचल खोत, चंचल पंचबुद्धे, प्रज्वल आरेकर, सुवर्णा वंजारी, भैरवी गांडोळे, साक्षी माळोदे, कृष्णा चांडक, मृणाल सावंत, अनुराधा चांडक, वैष्णवी सौन्दरकर, खुशाली तरेकर, अशा अनेक रा. से. यो. चे वरिष्ठ व कनिष्ठ स्वयंसेवकांनी कार्यक्रम नियोजनात अथक परिश्रम घेतले.

जय गजानन यात्रा कंपनी
द्वारा आयोजित तिरुपती बालाजी दर्शन व कालहस्ती श्रीकालाहस्तीश्वर मंदिर यात्रा
व रेल्वे द्वारे २ स्थळे
दि. २३ डिसें. २०२१ पासून ४ दिवस
स्लीपर व सीटर लक्झरी बस, प्रवास, हॉटेल, निवास भोजन सह व्यवस्था
संचालक श्री. दिलीपराव मडगे | 7972127640
बुकींगकरीता संपर्क ऋषभ दि. मडगे | 9552014476
ऑफीस : गणेश मंगलम जवळ, देवमाळी विभाग, परतवाडा शहर

आपल्या शहरातील प्रत्येक बातमी
अध्ययन समाचार — आता रोज रहा अपडेट! — SOCIAL MEDIA EDITION
आज जागतिक जैवविविधता दिन
संपादक : जितेंद्र रोडे
कार्यालय : ब्राम्हणसभा कॉलनी, डॉ. गजभे यांच्या दवाखान्या समोर, लाकुड बाजार, परतवाडा. जि. अमरावती 444 805 | भ्रमणध्वनी : 9422158005 | दुरध्वनी : 07223-222005 | jitendrarode77@gmail.com | Adhayayn Samachar
दि. २२ मे २०२१

## कोविड-१९ लसीकरण जनजागृती करीता
## नागपूरच्या डॉक्टरांद्वारे मार्गदर्शन पर ऑनलाइन कार्यक्रम

**धा.रेल्वे दि. २२ | प्रज्योत पहाडे**

स्थानिक संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ संलग्नित धामणगाव एज्युकेशन सोसायटी द्वारा संचालित आदर्श महाविद्यालय, धामणगाव रेल्वे येथील राष्ट्रीय सेवा योजना व वाणिज्य विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने कोविड १९ लसीकरण जनजागृती अभियान (ऑनलाइन) आयोजित केला गेला.



सर्वांना माहीत आहे की गेल्या १७ महिन्यापासून कोरोना महामारी मुळे संपूर्ण जग प्रभावित झाले आहे व त्यामुळे कोरोनावर मात करायची असेल तर लसीकरण हाच एकमेव पर्याय आहे. पण त्यासंदर्भात अनेक शंका, कुशंका व भीती लोकांच्या मनात आहे. ही भीती दूर करून लोकांना लस घेण्यास प्रेरित करण्यासाठी सदर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

'कोविड-१९ लसीकरण : शंका व समाधान' या विषयावर स्वयं कोरोना योद्धा असलेल्या डॉक्टरांद्वारे मार्गदर्शन व संबंधीत प्रश्नमंजुषेचे आयोजनास शाळा व महाविद्यालये बंद आहे तरी शिक्षक, पालक, जनता व विद्यार्थ्यांचा या आभासी कार्यक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

लसीकरण किती गरजेचे आहे असे आवाहन करीत प्रमुख वक्ते व मार्गदर्शक म्हणून नागपूरचे सुप्रसिद्ध डॉ. ऋषिकेश बरडे व डॉ. वैशाली बरडे यांनी सोप्या शब्दात कोरोना विषयी शंकाचे समाधान करीत सर्वांचे कोरोना लसीविषयी गैरसमज दूर केले. कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ. योगेंद्र गांडोळे प्राचार्य, आदर्श महाविद्यालय यांनी योग्य मार्गदर्शन करीत सर्वांना लसीकरण करून घ्या असे आवाहन केले.

२ दिवसांपूर्वी पासून सोशल मीडिया वर जनजागृती करीत सर्व इच्छुकांनी या कार्यक्रमासाठी दिलेल्या लिंक वर क्लिक करून जॉईन करावे असे आवाहन करण्यात आले. सदर कार्यक्रम आभासी स्वरूपात १९ मे २०२१ रोजी सकाळी ११ ते दुपारी १ वाजेपर्यंत गुगल मीट वर घेण्यात आला. अनेकांनी अर्धा तासापूर्वीच या कार्यक्रमाला उपस्थिती दर्शविली. शेवटी प्रश्नोत्तरे विचारून अनेकांनी आपल्या शंकांचे समाधान करून घेतले.

या कार्यक्रमाच्या आयोजनाकरिता व यशस्वितेकरिता डॉ. नरेन्द्र नागपुरे- रासेयो कार्यक्रम अधिकारी, डॉ. आनंद नरांजे- वाणिज्य विभाग प्रमुख व समन्वयक IQAC, प्रा. रुपेश डहाके समन्वयक, वाणिज्य मंडळ, प्रा. श्रीकांत पाटील रासेयो सहा. कार्यक्रम अधिकारी, प्रा. जितेंद्र बारुळकर, डॉ. माधुरी कोपूलवार, प्रा. नितीन सिंघवी, आदर्श बरवट व इतर शिक्षक यांनी समयोचित परिश्रम घेतले. महाराष्ट्र राज्यात सर्वांना कार्यक्रम दरम्यान व नंतर ऑनलाइन प्रश्नमंजुषा दिली, त्याचे उत्तर देऊन ४२१ जणांनी ई-प्रमाणपत्र मिळविले. अश्याप्रकारे लोकांना लसीकरणाची माहिती देऊन, नोंदणी व संबंधित प्रश्न सोडवून शंका मनात न ठेवता कोरोना लसीकरण करण्यास सांगण्यात आले. कार्यक्रमाचे संचालन डॉ नागपुरे यांनी तर आभार प्रदर्शन कु. नुपूर नन्नावरे हिने केले.

श्री विनायक मार्ट
चोखंदळ ग्राहकांची स्मार्ट निवड !
हर दिन सस्ता दिन !
मोफत घरपोच सेवा 9516092222
किराणा ▸ धान्य ▸ कॉस्मेटिक ▸ ड्राय फ्रुट्स
बेकरी आयटम्स् ▸ स्टेशनरी ▸ आईस्क्रिम ▸ कोल्ड्रींक्स्
चिखलदरा रोड, परतवाडा

## आदर्श महाविद्यालय धामणगाव रेल्वे येथे राष्ट्रीय सेवा योजनेचा उद्घाटन दिन थाटात साजरा

### डॉ. आकाश येंडे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित
### रा.से.यो. उद्घाटन सोहळ्या निमित्त भव्य कोव्हीड 19 प्रतिबंधात्मक लसीकरण मोहीम



[illegible]

## आदर्श महाविद्यालय में रासेयो कार्यक्रम का उद्घाटन



### डॉ. आकाश येंडे की प्रमुख उपस्थिति

**धामणगांव रेल्वे। मंगल प्रहर संवाददाता**

धामणगांव एज्युकेशन सोसायटी हिंदी भाषीक अल्पसंख्याक शिक्षा संस्था व्दारा संचालित आदर्श विज्ञान, ज.भा.कला व बिरला वाणिज्य महाविद्यालय में राष्ट्रीय सेवा कार्यक्रम का उद्घाटन किया गया। जिसमें एम.डी. आकाश येंडे मार्गदर्शक के रुप में उपस्थित थे।

महाविद्यालय के प्राचार्य डॉ. वाय.बी. गाडोले के हाथों कार्यक्रम का उद्घाटन किया गया। डॉ. येंडे ने स्वयंसेवको को कोविड टीकाकरण का महत्व बताकर कोरोना काल में राष्ट्रीय सेवा योजना के महत्वपूर्ण योगदान पर मार्गदर्शन किया। इस अवसर पर टीकाकरण अभियान भी चलाया गया। कार्यक्रम में डॉ. नरेंद्र नागपुरे, डॉ.एम.वाय.कोकुलवार, डॉ. श्रीकांत पाटिल, डॉ. प्रवीण केचे, डॉ.पूनम गहुकर, वैष्णवी राऊत, सिरमन तुलसकर, अथर्व गावंडे, चंचल खोत, चंचल पंचबुध्दे, प्रज्वल आरेकर, सुवर्णा वंजारी, भैरवी गाडोले, साक्षी मालोदे, कृष्णा चांडक, मृणाल सावंत, अनुराधा चांडक, वैष्णवी सौंदकर, खुशाली त-हेकर आदि उपस्थित थे।

साप्ताहिक परतवाडा टाईम्स
संपादक - नरेश तायवाडे | मो. 9552970699 | paratwadatimes@gmail.com | 27-10-2021

## आदर्श महाविद्यालय येथे राष्ट्रीय सेवा योजनेचा उद्घाटन दिन थाटात साजरारा
## से.यो. उद्घाटन सोहळ्या निमित्त भव्य कोव्हीड १९ प्रतिबंधात्मक लसीकरण मोहीम

**धामणगाव रेल्वे | सुयोग देशपांडे**

धामणगाव एज्युकेशन सोसायटी हिंदी भाषिक अल्पसंख्यांक शैक्षणिक संस्था द्वारा संचालित आदर्श विज्ञान, ज. भा. कला व बिरला वाणिज्य महाविद्यालयामध्ये राष्ट्रीय सेवा योजनेचा उद्घाटन सोहळा २०२१-२२ दिनांक २३.१०.२०२१ या दिवशी थाटात पार पडला. या उद्घाटन सोहळ्यामध्ये अध्यक्ष स्थान महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. वाय. बी. गांडोळे यांनी भूषविले. या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे आणि मार्गदर्शक म्हणून डॉ. आकाश येंडे (एम. डी. कम्युनिटी मेडिसिन) उपस्थित होते. या कार्यक्रमा मध्ये त्यांनी कार्यक्रमाला उपस्थित असलेल्या रा से यो स्वयंसेवकांना कोव्हीड १९ लसीकरणाचे महत्व, कोरोना काळातील कठीण दिवस, राष्ट्रीय सेवा योजनेचे आपल्या सामाजिक जीवनातील महत्व अशा अनेक विषयावर मोलाचे मार्गदर्शन केले.



या उद्घाटन सोहळ्या मध्ये माजी कार्यक्रम अधिकारी डॉ. नरेंद्र नागपुरे व डॉ. एम. वाय. कोपुलवार यांच्या हस्ते पद हस्तांतरण सोहळा पार पाडण्यात आला. या मध्ये त्यांनी आपला कार्यक्रम अधिकारी हा कार्यभार प्रा. श्रीकांत पाटील यांच्याकडे रा से यो बिल्ला देऊन सोपविला व सोबतच सहाय्यक कार्यक्रम अधिकारी डॉ. प्रवीण केचे व महिला सहाय्यक कार्यक्रम अधिकारी डॉ. पूनम गहुकर यांना सुद्धा कार्यभार सोपवण्यात आला. या प्रसंगी डॉ. नरेंद्र नागपुरे यांनी आपल्या विशिष्ट शैली मध्ये स्वतःचा ०६ वर्षांचा राष्ट्रीय सेवा योजनेचा कार्यकाल आणि पुढील रा.से.यो. ची वाटचाल या वर भाषण केले व उपस्थितांना मंत्र मुग्ध केले. या उद्घाटन सोहळ्याला महाविद्यालयाच्या इतर शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे अध्यक्षीय समारोप प्राचार्य डॉ. वाय. बी. गांडोळे सरांनी केला. या उद्घाटन सोहळ्याच्या निमित्ताने सर्वप्रथम "स्वच्छता हीच सेवा" या साधुक्ती चा वापर करून महाविद्यालयीन परिसर स्वच्छता अभियान राबवण्यात आले. नंतर कार्यक्रमाच्या उत्तरार्धात राष्ट्रीय सेवा योजना आणि ग्रामीण रुग्णालय धामणगाव रेल्वे यांच्या संयुक्त विद्यमाने शासन नियमानुसार "भव्य कोव्हीड-१९ प्रतिबंधात्मक लसीकरण मोहीम" महाविद्यालयाच्या सर्व शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचारी आणि विद्यार्थ्यांसाठी राबवण्यात आली. या लसीकरण मोहिमे अंतर्गत महाविद्यालयाच्या ११९ विद्यार्थ्यांचे लसीकरण करण्यात आले सोबतच काही शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी पण आपले लसीकरण करून घेतले. या दरम्यान काही गावकरी मंडळीनी सुद्धा लसीकरण करण्यासाठी या मोहिमे मध्ये सहभाग घेतला. ही लसीकरण मोहीम पूर्णत्वास नेण्यासाठी ग्रामीण रुग्णालय धामणगाव रेल्वे येथील वैद्यकीय चमू आणि रा.से.यो. स्वयंसेवकांनी अथक परिश्रम घेतले. उद्घाटन सोहळ्याचे व लसीकरण मोहिमेचे संपूर्ण नियोजन रा.से.यो स्वयंसेवकांनी केले. या मध्ये सूत्रसंचालन वैष्णवी राउत व सिमरन तुळसकर यांनी केले, प्रमुख पाहुण्यांचा परिचय नव नियुक्त सहा. कार्यक्रम अधिकारी डॉ. प्रवीण केचे यांनी केले व शेवटी आभार प्रदर्शन अथर्व गावंडे याने केले. चंचल खोत, चंचल पंचबुद्धे, प्रज्वल आरेकर, सुवर्णा वंजारी, भैरवी गांडोळे, साक्षी माळोदे, कृष्णा चांडक, मृणाल सावंत, अनुराधा चांडक, वैष्णवी सौन्दरकर, खुशाली तरेकर, अशा अनेक रा. से. यो. चे वरिष्ठ व कनिष्ठ स्वयंसेवकांनी कार्यक्रम नियोजनात अथक परिश्रम घेतले.

फ्रेश स्टॉक SALE! 50% तक छुट
अनुराग फॅशन्स्
मेन रोड परतवाडा | सदर बाजार, परतवाडा | 7721812979 | 9422590119

आपल्या शहरातील प्रत्येक बातमी
अध्ययन समाचार — आता रोज रहा अपडेट! — SOCIAL MEDIA EDITION
संपादक : जितेंद्र रोडे
कार्यालय : ब्राम्हणसभा कॉलनी, डॉ. गजभे यांच्या दवाखान्या समोर, लाकुड बाजार, परतवाडा. जि. अमरावती 444 805 | भ्रमणध्वनी : 9422158005 | दुरध्वनी : 07223-222005 | jitendrarode77@gmail.com | Adhayayn Samachar
गुरुवार दि. २८ ऑक्टोंबर २०२१

### आदर्श विज्ञान,ज. भा. कला व बिरला वाणिज्य महाविद्यालय, धामणगाव रेल्वे येथे
## राष्ट्रीय रसायनशास्त्र सप्ताह थाटात साजरा

**धा.रेल्वे दि.२८ प्रज्योत पहाडे**

17 ऑक्टोबर ते 23 ऑक्टोबर हा संपूर्ण सप्ताह राष्ट्रीय रसायनशास्त्र सप्ताह म्हणून साजरा केला जातो याचेच औचित्य साधून रसायनशास्त्र विभाग आदर्श महाविद्यालय धामणगाव रेल्वे येथे राष्ट्रीय रसायनशास्त्र सप्ताह साजरा केला गेला या सप्ताहामध्ये विविध असे रसायनशास्त्र या विषयाच्या निगडित कार्यक्रम आयोजित करण्यात आले त्यामध्ये 20 ऑक्टोबरला विद्यार्थ्यांकरिता "ड्रग्स डिझाईनिंग फॉर कोविड-19" या विषयावर गेस्ट लेक्चर घेण्यात आले डॉ. व्हि. एच. मसंन, विद्याभारति महाविद्यालय अमरावति हे प्रमुख वक्ते म्हणून यांनी कार्यक्रमाला उपस्थिती दर्शवली व विद्यार्थ्यांना मोलाचे मार्गदर्शन केले तसेच रसायनशास्त्र विभागाकडून




विद्यार्थ्यांकरिता पोस्टर व ॲबस्ट्रक्ट रायटिंग अशा राज्यस्तरीय स्पर्धा घेण्यात आल्या व त्या स्पर्धेमध्ये विविध महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी सहभाग दर्शविला. तसेच विद्यार्थ्यांच्या मनामध्ये रसायनशास्त्र या विषयाची गोडी निर्माण करण्याकरिता व रसायनशास्त्र या विषयाचे महत्त्व पटवून देण्याकरिता विभागाने 25 ऑक्टोबरला ऑनलाइन पद्धतीने गेस्ट लेक्चर आयोजित केले त्यात प्रमुख वक्ता मिस श्रेया उन्होणे, गॉटिंगन जर्मनी येथून विद्यार्थ्यांना "घरापासून ते जर्मनी" पर्यंतचा रसायनशास्त्र विषयाच्या अभ्यासाकरिता केलेला प्रवास या विषयावर विद्यार्थ्यांचे मार्गदर्शन केले श्रेया उन्होणे ही आदर्श महाविद्यालयाची बी.एस.सी ची माजी विद्यार्थिनी असून सध्या ती गॉटिंगन जर्मनी येथे रसायनशास्त्र विषयात उच्च शिक्षण घेत आहे.

अशाप्रकारे विविध कार्यक्रमाचे आयोजन करून रसायनशास्त्र विभागाने 17 ऑक्टोबर ते 23 ऑक्टोबर हा सप्ताह राष्ट्रीय रसायन शास्त्र सप्ताह 2021-22 म्हणून विद्यार्थ्यांन बरोबर आभासी पद्धतीने साजरा केला संपूर्ण कार्यक्रम यशस्वीरित्या पार पाडण्याकरिता महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. वाय. बी. गांडोळे तसेच रसायनशास्त्र विभागाचे प्रमुख डॉ. एस. व्ही. मनोहरे यांचे मोलाचे सहकार्य लाभले. कार्यक्रमाचे नियोजन डॉ. व्हि. ए. सदाफळे, डॉ. एच.पी. मुंगसे तसेच कार्यक्रमाचे आयोजन हे डॉ. पी. एम. केचे यांनी यशस्वीरित्या पार पाडले. सोबतच डॉ. ए.जी. नरांजे, डॉ. एस.ओ. कुरेशी, प्राध्यापक एस.टी. पेंदाम, प्राध्यापक एस.पी. पाटील, प्राध्यापक जे.जी. सूर्यवंशी, प्रमोदजी गावंडे अशे अनेक शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांचेही मोलाचे सहकार्य लाभले.

ग्राहकों की पहली पसंद...
सेल | SALE | सेल | SALE 10% to 50% Discount
रतन (सेंचुरी) क्लॉथ सेंटर
साड़ियां • फैन्सी साड़ियां • बनारसी शालू • लाचा
कोट-सूट • शेरवानी • मेन्स वेयर • किड्स वेयर • लेडिज वेयर
संपूर्ण लग्न वस्त्र
9970942757, 7709431508

# आदर्श विज्ञान, ज. भा. कला व बिरला वाणिज्य महाविद्यालय धामणगाव रेल्वे येथे राष्ट्रीय रसायनशास्त्र सप्ताह थाटात साज

**ता.प्रतिनिधी-२१ ऑक्टोबर**




**धामणगाव रेल्वे** : 17 ऑक्टोबर ते 23 ऑक्टोबर हा संपूर्ण सप्ताह राष्ट्रीय रसायनशास्त्र सप्ताह म्हणून साजरा केला जातो याचेच औचित्य साधून रसायनशास्त्र विभाग आदर्श महाविद्यालय धामणगाव रेल्वे येथे राष्ट्रीय रसायनशास्त्र सप्ताह साजरा केला गेला या सप्ताहमध्ये विविध असे रसायनशास्त्र या विषयाच्या निगडित कार्यक्रम आयोजित करण्यात आले त्यामध्ये 20 ऑक्टोबरला विद्यार्थ्यांकरिता ड्रग्स डिझाईनिंग फॉर कोविड-19 या विषयावर गेस्ट लेक्चर घेण्यात आले डॉ. व्हि. एच. मसंन, विद्याभारति महाविद्यालय अमरावति हे प्रमुख वक्ते म्हणून यांनी कार्यक्रमाला उपस्थिती दर्शवली व विद्यार्थ्यांना मोलाचे मार्गदर्शन केले तसेच रसायनशास्त्र विभागाकडून विद्यार्थ्यांकरिता पोस्टर व ?बस्ट्रक्ट रायटिंग अशा राज्यस्तरीय स्पर्धा घेण्यात आल्या व त्या स्पर्धेमध्ये विविध महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी सहभाग दर्शविला. तसेच विद्यार्थ्यांच्या मनामध्ये रसायनशास्त्र या विषयाची गोडी निर्माण करण्याकरिता व रसायनशास्त्र या विषयाचे महत्त्व पटवून देण्याकरिता विभागाने 25 ऑक्टोबरला ऑनलाइन पद्धतीने गेस्ट लेक्चर आयोजित केले त्यात प्रमुख वक्ता मिस श्रेया उन्होणे, वॉशिंगटन जर्मनी येथन विद्यार्थ्यांना घरापासून ते जर्मनी पर्यंतचा रसायनशास्त्र विषयाच्या अभ्यासाकरिता केलेला प्रवास या विषयावर विद्यार्थ्यांचे मार्गदर्शन केले श्रेया उन्होणे ही आदर्श महाविद्यालयाची बी.एस.सी ची माजी विद्यार्थिनी असून सध्या ती वॉशिंगटन जर्मनी येथे रसायनशास्त्र विषयात उच्च शिक्षण घेत आहे.

अशाप्रकारे विविध कार्यक्रमाचे आयोजन करून रसायनशास्त्र विभागाने 17 ऑक्टोबर ते 23 ऑक्टोबर हा सप्ताह राष्ट्रीय रसायन शास्त्र सप्ताह 2021-22 म्हणून विद्यार्थ्यांन बरोबर आभासी पद्धतीने साजरा केला संपूर्ण कार्यक्रम यशस्वीरित्या पार पाडण्याकरिता महाविद्याल प्राचार्य डॉ. वाय. बी. गांडोळे रसायनशास्त्र विभागाचे प्रमु एस. व्ही. मनोहरे यांचे मो सहकार्य लाभले.

कार्यक्रमाचे नियोजन डॉ ए. सदाफळे, डॉ. एच.पी. तसेच कार्यक्रमाचे आयोजन पी. एम. केचे यांनी यशस्वी पार पाडले. सोबतच डॉ. नरांजे, डॉ. एस.ओ. कु प्राध्यापक एस. टी. प्राध्यापक एस.पी. प प्राध्यापक जे.जी. सूर्य प्रमोदजी गावंडे असे अनेक व शिक्षकेत्तर कर्मचारी य मोलाचे सहकार्य लाभले.

---


आपल्या शहरातील प्रत्येक बातमी
SOCIAL MEDIA EDITION
|| श्रीकृष्णम् वंदे जगतगुरुम् ||
# अध्ययन समाचार
आता रोज रहा अपडेट!
संपादक : जितेंद्र रोडे
आज जयंती
श्री चक्रपाणी प्रभु
कार्यालय : ब्राम्हणसभा कॉलनी, डॉ. गजभे यांच्या दवाखान्या समोर, लाकुड बाजार, परतवाडा. जि. अमरावती 444 805
भ्रमणध्वनी : 9422158005
दुरध्वनी : 07223-222005
jitendrarode77@gmail.com
Adhayayn Samachar
शनिवार दि.३० ऑक्टोंबर २०२१


## आदर्श महाविद्यालयात वाणिज्य मंडळाची स्थापना व उदघाटन

**धा.रेल्वे दि.३० प्रतिनिधी**

स्थानिक आदर्श विज्ञान, जयरामदास भागचंद कला व बिर्ला वाणिज्य महाविद्यालयामध्ये सत्र २०२१-२२ करिता शुक्रवार दि. २९ ऑगस्ट २०२१ ला वाणिज्य विभागातर्फे वाणिज्य मंडळाच्या उद्घाटनाचा कार्यक्रम ऑनलाईन व ऑफलाईन पद्धतीने आयोजित करण्यात आला होता. या उद्घाटन सोहळ्यास प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित असलेले डॉ तुषार सोमनाथे, प्लेसमेंट अधिकारी, NTPC School of Business, Noida यांनी सर्व सदस्यांना व विद्यार्थी यांना जीवनात यशस्वी कसे व्हावे, यशस्वी



करियर कसं घडवायचं या विषयावर उत्तम असे मार्गदर्शन केले.

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. योगेंद्र गांडोळे यांनी अध्यक्षीय भाषण करून प्रमुख वक्त्यांचे आभार मानले तसेच आयोजक आणि सहभागी सदस्यांचे अभिनंदन केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक व वक्त्यांचा परिचय प्रा. रूपेश डाहाके यांनी केले.

सदर वेबिनार यशस्वी करण्यासाठी वाणिज्य विभागाच्या विद्यार्थ्यांसह विभाग प्रमुख डॉ आनंद नरांजे, प्रा. नितीन सिंघवी, डॉ. नरेंद्र नागपुरे, प्रा. रूपेश डाहाके, प्रा.जितेंद्र बारुळकर, प्रा.श्रीकांत पाटील आणि श्री वसंत तायडे यांचे मोलाचे सहकार्य लाभले. सदर कार्यक्रमाला महाराष्ट्र तसेच भारतातील विविध राज्यांमधून 200 आजी माजी विद्यार्थ्यांनी आणि सदस्यांनी सहभाग नोंदविला. याप्रसंगी वर्ष 2021 22 करिता वाणिज्य मंडळाच्या कार्यकारणीची घोषणा करण्यात आली. यात मोहित गोहणे अध्यक्ष, वैष्णवी राउत व साक्षी कोरडे उपाध्यक्ष, चंचल खोत सचिव, ऋषभ ठाकरे व सुमित भाग्यवंत सह-सचिव, संस्कृती मांडले कोषाध्यक्ष मनीष ठाकरे सह-कोषाध्यक्ष अशी कार्यकारिणी गठीत झाली.


बबलु राठौर
RBK
राठौर बिछायत केंद्र
गोविंद नगर, गोविंद टॉकीज के पिछे, कांडली, परतवाडा 9422159024 | 7020386554


---

# स्वतंत्रता क्रांतिकारियों के त्याग व बलिदान का प्रतीक है



## आजादी के अमृत महोत्सव में प्राचार्य डॉ. योगेंद्र गांडोले का प्रतिपादन

**संवाददाता, 18 दिसंबर**

**धामणगांव रेलवे-** देश को मिली स्वतंत्रता क्रांतिकारियों के त्याग व बलिदान का प्रतीक है. अपना संपूर्ण जीवन देशसेवा में समर्पित करने वाले देशभक्तों से युवक प्रेरणा लें. उनका त्याग भुलाया नहीं जा सकता, ऐसा प्रतिपादन प्राचार्य डॉ. योगेंद्र गांडोले ने किया. स्थानीय आदर्श महाविद्यालय में आजादी के अमृत महोत्सव पर विशेषांक के विमोचन व व्याख्यान में वे बतौर अध्यक्ष बोल रहे थे. प्रमुख अतिथि के रूप में प्रा. निखिल मोहोड़ उपस्थित थे.

विशेषांक के बारे में विशाल मोकाशे ने कहा कि लेख व कविताओं के माध्यम से स्वतंत्रता सेनानियों का अभिवादन किया गया है. स्वतंत्रता आंदोलन में भगतसिंह, राजगुरु, सुखदेव, कुंवर सिंह के बलिदान का इतिहास बताकर उन्होंने युवकों को मंत्रमुग्ध कर दिया.

प्रस्तावना डॉ. किशोर बारापात्रे, संचालन प्रा. विलास नागोशे तथा आभार दीप बेलोनकर ने माना. सफल आयोजन हेतु डॉ. रुपेश डहाके, डॉ. नरेंद्र नागपुरे, प्रा. श्रीकांत पाटिल, प्रा. जीतेंद्र बारुड़कर, प्रा. डॉ. फुरकान पठान ने प्रयास किए.

ाशीखेड़ भी अधूरा

---


साप्ताहिक
# परतवाडा टाईम्स
संपादक - नरेश तायवाडे मो. 9552970699 paratwadatimes@gmail.com 02-12-2021


## धामणगाव तालुक्यातील ३७ गावामध्ये एकाच वेळी मतदान जनजागृती अभियान
## राष्ट्रीय सेवा योजना आदर्श महाविद्यालयाचा आगळा वेगळा उपक्रम

**धामणगाव रेल्वे | सुयोग देशपांडे**

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती कडून प्राप्त परिपत्रकानुसार, राष्ट्रीय सेवा योजना, आदर्श महाविद्यालय धामणगाव रेल्वे द्वारा महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. वाय. बी. गांडोळे यांच्या मार्गदर्शनाखाली दिनांक 01.11.2021 ते 30.11.2021 या कालावधी दरम्यान मतदार जनजागृती अभियान राबवण्यात आले. या अभियाना दरम्यान विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. हे आयोजन करताना नवीन मतदार विद्यार्थी ज्यांची नावाची नोंद मतदार यादी मध्ये झाली नाही त्यांना केंद्रस्थानी ठेवून विविध कार्यक्रमाचे व उपक्रमाचे महाविद्यालयीन स्तरावर व दत्तक ग्राम स्तरावर आयोजन करण्यात आले. याच उपक्रमाचा एक भाग म्हणून, दिनांक 29.11.2021 ते 30.11.2021 या दरम्यान राष्ट्रीय सेवा योजना धामणगाव रेल्वे विभागाने मतदान जन जागृती चा उपक्रम



३७ गावामध्ये मतदान जन जागृती साठी पॉम्प्लेट वाटप करून पार पाडला. या उपक्रमा दरम्यान 'मतदान मित्र' म्हणून नेमणूक केलेल्या रा. से. यो. स्वयंसेवकांनी महाविद्यालयाच्या प्रत्येक वर्गात जाऊन विद्यार्थ्यांना जनजागृती अभियाना संदर्भात मार्गदर्शन केले व पॉम्प्लेट वितरीत केले. त्या विद्यार्थ्यांनी आपापल्या गावामध्ये जाऊन नवीन मतदार व इतर गावकरी मंडळींना नवीन मतदार नोंदणी व संपूर्ण मतदान प्रक्रिये बद्दल मार्गदर्शन केले व पॉम्प्लेट वितरीत केले. अश्या पद्धतीचा संपूर्ण कार्यक्रम रा से यो दत्तक ग्राम वाढोणा येथे सुद्धा अतिशय चांगल्या पद्धतीने राबवण्यात आला. या कार्यक्रमाच्या यशस्विते करिता रा. से यो चमूतील स्वयंसेवकांनी 'मतदान मित्र' म्हणून अथक परिश्रम घेतले सोबतच महाविद्यालयाच्या बी. ए., बी. कॉम., ब एस सी., बी. सी. ए., एन. सी. सी. अश वेगवेगळ्या विभागातील इतर विद्यार्थ्यां सुद्धा या उपक्रमाला अभूतपूर्व प्रतिस दिला. या संपूर्ण कार्यक्रमाच्या यशस्वि करिता रा. से यो. सहा. कार्यक्रम अधिका डॉ. प्रवीण केचे, महिला कार्यक्र अधिकारी डॉ. पूनम गहुकर यांनी मोला मार्गदर्शन केले.


NIMKAR BROTHER'S
MERIT
CONSTRUCTION ASSOCIATES
QUALITY MATTER
मेरीट कन्स्ट्रक्शन असोसिएट्स
विशेष सवलतीसह बांधकामाची बुकिंग सुरु आहे.
Er.Anup N. Nimkar (B.E.Civil, M.E.Structure)
Swapnil N. Nimkar (M.B.A. Finance)
ऑफिस पता : 1. गोविंद टॉकीज जवळ, कांडली परतवाडा. ऑफिस पता : 2. जयस्तंभ चौक, अमरावती. 9767177041 / 9890502927

आमच्या सोबत..आता दररोज रहा अपडेट !
# परतवाडा टाईम्स
SOCIAL MEDIA EDITION
संपादक:-नरेश तायवाडे
देशमुख प्लॉट,पेन्शनपुरा परतवाडा ता.अचलपूर,जि.अमरावती-444805 | भ्रमणध्वनी-9552970699 | paratwadatimes@gmail.com | paratwadatimes | YouTube paratwadatimes
दि. 26-12-2021

## आदर्श महाविद्यालयामध्ये अभिरुप चाचणी परीक्षेला उस्फुर्त प्रतिसाद विद्यार्थ्यांना लोकसेवा व राज्यसेवा परीक्षेचा प्रत्यक्ष अनुभव

**धामणगाव रेल्वे | सुयोग देशपांडे**

धामणगाव एज्युकेशन संस्था द्वारा संचालित, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ अमरावती, अमरावती संलग्नित आदर्श विज्ञान, ज. भा. कला व बिर्ला वाणिज्य महाविद्यालय धामणगाव येथे प्राचार्य डॉ. वाय. बी. गांडोळे यांच्या मार्गदर्शनाखाली शुक्रवार दिनांक २४.१२. २०२१ रोजी विद्यार्थी मार्गदर्शन केंद्र (STUDENT GUIDANCE BUREAU) कडून 'अभिरुप मुलाखत' स्पर्धेचा एक भाग म्हणून अभिरूप चाचणी परीक्षेचे यशस्वी




आयोजन करण्यात आले. या परीक्षेला वरिष्ठ महाविद्यालयाच्या कला वाणिज्य व विज्ञान शाखेच्या ८१ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला व परीक्षा दिली. या परीक्षेसाठी तयार करण्यात आलेली प्रश्न पत्रिका शासनाच्या वेगवेगळ्या स्पर्धा परीक्षेच्या अभ्यास करून तज्ञ प्राध्यापक वर्गा द्वारे तयार केली होती. सहभागी विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षा कशी असते व प्रश्नाची कठीण्य पातळी किती असते या बद्दल चे ज्ञान अवगत करून देणे हा या परीक्षेच्या आयोजकांचा प्रमुख हेतू होता. या परीक्षेचे संपूर्ण नियोजन हे विद्यार्थी मार्गदर्शन केंद्र व विद्यार्थी समुपदेशन कक्षाचे प्रमुख समन्वयक डॉ. विष्णू सदाफळे यांनी केले व ही परीक्षा उत्तम रित्या पार पाडण्या साठी IQAC विभाग प्रमुख डॉ. आनंद नरांजे, प्रा. नितीन सिंघवी, प्रा. जितेंद्र सुर्यावंशी, प्रा. गिरीश मेंढे, डॉ. नरेंद्र नागपुरे, प्रा. जितेंद्र बारूळकर, व इतर प्राध्यापक वृंद यांनी अथक परिश्रम घेतले.

NIMKAR BROTHER'S
MERIT
CONSTRUCTION ASSOCIATES
QUALITY MATTER
मेरीट कन्स्ट्रक्शन असोसिएट्स
विशेष सवलतीसह बांधकामाची बुकिंग सुरु आहे.



Er.Anup N. Nimkar (B.E.Civil, M.E.Structure) Swapnil N. Nimkar (M.B.A. Finance)
ऑफिस पता : 1. गोविंद टॉकीज जवळ, कांडली परतवाडा. ऑफिस पता : 2. जयस्तंभ चौक, अमरावती. 9767177041 / 9890502927

पुण्यनगरी

पुण्यनगरी

## आदर्श महाविद्यालयात स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन कार्यशाळा

**पुण्य नगरी** / तालुका प्रतिनिधी

**धामणगाव रेल्वे :** स्थानिक आदर्श महाविद्यालय येथे वाणिज्य विभागाचे वाणिज्य मंडळ आणि विद्यार्थी मार्गदर्शन केंद्रद्वारा स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन कार्यशाळा आयोजित करण्यात आली. सदर कार्यक्रमासाठी ध्येय ॲकॅडमीचे संचालक प्रा.सुचित कुंभारकर हे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते.

कार्यक्रमाचे अध्यक्षपद महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. योगेंद्र गांडोळे यांनी भूषविले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व परिचय डॉ.नरेंद्र नागपुरे यांनी केला. कार्यक्रमाला यशस्वीतेकरिता ऋषभ ठाकरे, मोहीत गोहणे, चंचल खोत, चंचल पंचबुद्धे यांनी परिश्रम घेतले. रिना कुमरे व सोनाली गुप्ता हिने कार्यक्रमाचे संचालन केले. या कार्यक्रमाला वाणिज्य विभाग प्रमुख डॉ.आनंद नरांजे, विद्यार्थी मार्गदर्शन कक्ष समन्वयक डॉ.विष्णू सदाफळे, डॉ.रुपेश डहाके, प्रा.जितेंद्र बारुळकर, प्रा. जितेंद्र सूर्यवंशी, प्रा.नितीन सिंघवी यांच्यासह अनेक शिक्षकवृंदांनी व विद्यार्थ्यांनी उपस्थिती दर्शविली.

Smart Amravati
Page No.3 December 25, 2021

## आदर्श महाविद्यालयमध्ये आर्थिक साक्षरता या विषयावर एकदिवसीय कार्यशाळा



**ता.प्रतिनिधी-२३ डिसेंबर**

**धामणगाव रेल्वे**-विध्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाकरिता, त्यांना पुस्तकी ज्ञानाबरोबरच प्रात्यक्षिक ज्ञानाच्या संधी उपलब्ध करून देणे महत्वाचे- चंद्रकांत मेश्राम, शाखा व्यवस्थापक, HDFC बँक शाखा धामणगांव रेल्वे यांचे प्रतिपादन. स्थानिक आदर्श विज्ञान, जयरामदास भागचंद कला व बिरला वाणिज्य महाविद्यालय, धामणगांव रेल्वे च्या अर्थशास्त्र विभागाद्वारा आयोजित आर्थिकसाक्षरता या विषयावरील एकदिवसीय कार्यशाळेमध्ये ते बोलत होते. अर्थशास्त्र विभागाद्वारे अर्थशास्त्र अभ्यास मंडळ उदघाटन व आर्थिक साक्षरता ( economic literary ) या विषयावर एकदिवसीय कार्यशाळेचे आयोजन दिनांक 21/12/2021 ला महाविद्यालयाच्या सभागृहात करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षतेस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. योगेन्द्रजी गांडोळे तर प्रमुख वक्ते म्हणून स्थानिक HDFC बँकेचे शाखा व्यवस्थापक चंद्रकांत मेश्राम उपस्थित होते. कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून प्रा. डॉ. संजय पाटील, इंग्रजी विभाग प्रमुख, प्रा. डॉ. किशोर बारापात्रे, इतिहास विभाग प्रमुख व कार्यक्रमाचे आयोजक तथा अर्थशास्त्र विभाग प्रमुख प्रा. डॉ. दिपक श्रुंगारे प्रामुख्याने मंचावर उपस्थित होते. मान्यवरांच्या हस्ते 2021-22 च्या अर्थशास्त्र अभ्यास मंडळाचे रीतसर उद्घाटन करण्यात आले, या मंडळाच्या कार्यकरणीमध्ये अध्यक्ष - रेवती गिधाने, उपाध्यक्ष -गौरव मेंढे , सचिव - कु. सोनू ठोसर - , सहसचिव - स्विटी गडलिंग, कोषाध्यक्ष - रोशन वानखडे , सदस्य म्हणून पुजा तरोणे, साहील काळे, देव्यानी रोंघे, मृणाली तंवर, आकाश माहुरे, अनिकेत मोडक, ओम भोंगे व वैष्णवी कोहरे यांची निवड करण्यात आली तर प्रसिद्धी प्रमुखाची जबाबदारी महिंद्रा काळे व सुवर्णा वंजारी यांच्याकडे

उर्वरित पान २ वर

आपल्या शहरातील प्रत्येक बातमी
# अध्ययन समाचार
आता रोज रहा अपडेट!
SOCIAL MEDIA EDITION
संपादक : जितेंद्र रोडे
कार्यालय : ब्राम्हणसभा कॉलनी, डॉ. गजभे यांच्या दवाखान्या समोर, लाकुड बाजार, परतवाडा. जि. अमरावती 444 805 | भ्रमणध्वनी : 9422158005 | दूरध्वनी : 07223-222005 | jitendrarode77@gmail.com | Adhayayn Samachar
बुधवार दि.२७ऑक्टोंबर २०२१

## आदर्श महाविद्यालय धा.रेल्वे येथे राष्ट्रीय सेवा योजनेचे उद्घाटन दिन थाटात साजरा रा.से.यो. उद्घाटन सोहळ्या निमित्त भव्य कोव्हीड १९ प्रतिबंधात्मक लसीकरण मोहीम

**धा.रेल्वे दि.२७ प्रज्योत पहाडे**

धामणगाव एज्युकेशन सोसायटी हिंदी भाषिक अल्पसंख्यांक शैक्षणिक संस्था द्वारा संचालित आदर्श विज्ञान, ज. भा. कला व बिरला वाणिज्य महाविद्यालयामध्ये राष्ट्रीय सेवा योजनेचा उद्घाटन सोहळा २०२१-२२ २३ ऑक्टोंबर रोजी थाटात पार पडला.

या उद्घाटन सोहळ्यामध्ये अध्यक्ष स्थान महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. वाय. बी. गांडोळे यांनी भूषविले. या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे आणि मार्गदर्शक म्हणून डॉ. आकाश येंडे (एम. डी. कम्युनिटी मेडिसिन) उपस्थित होते. या कार्यक्रमा मध्ये त्यांनी कार्यक्रमाला उपस्थित असलेल्या रा से यो स्वयंसेवकांना कोव्हीड १९ लसीकरणाचे महत्व, कोरोना काळातील कठीण दिवस, राष्ट्रीय सेवा योजनेचे आपल्या सामाजिक जीवनातील महत्व अशा अनेक विषयावर मोलाचे मार्गदर्शन केले.



या उद्घाटन सोहळ्या मध्ये माजी कार्यक्रम अधिकारी डॉ. नरेंद्र नागपुरे व डॉ. एम. वाय. कोपुलवार यांच्या हस्ते पद हस्तांतरण सोहळा पार पाडण्यात आला. या मध्ये कार्यभार प्रा. श्रीकांत पाटील यांच्याकडे रा से यो बिल्ला देऊन सोपविला व सोबतच सहाय्यक कार्यक्रम अधिकारी डॉ. प्रवीण केचे व महिला सहाय्यक कार्यक्रम अधिकारी डॉ. पूनम गहुकर यांना सुद्धा कार्यभार सोपवण्यात आला. या प्रसंगी डॉ. नरेंद्र नागपुरे यांनी आपल्या विशिष्ट शैली मध्ये स्वत:चा ०६ वर्षाचा राष्ट्रीय सेवा योजनेचा कार्यकाळ आणि पुढील रा.से.यो. ची वाटचाल या वर भाषण केले व उपस्थितांना मंत्र मुग्ध केले.

या उद्घाटन सोहळ्याला महाविद्यालयाच्या इतर शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे अध्यक्षीय समारोप प्राचार्य डॉ. वाय. बी. गांडोळे या उद्घाटन सोहळ्याच्या निमित्ताने सर्वप्रथम "स्वच्छता हीच सेवा" या साधुत्त्कि चा वापर करून महाविद्यालयीन परिसर स्वच्छता अभियान राबवण्यात आले. नंतर कार्यक्रमाच्या उत्तरार्धात राष्ट्रीय सेवा योजना आणि ग्रामीण रुग्णालय धामणगाव रेल्वे यांच्या संयुक्त विद्यमाने शासन नियमानुसार "भव्य कोव्हीड-१९ प्रतिबंधात्मक लसीकरण मोहीम" महाविद्यालयाच्या सर्व शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचारी आणि विद्यार्थ्यांसाठी राबवण्यात आली.

या लसीकरण मोहिमे अंतर्गत महाविद्यालयाच्या ११९ विद्यार्थ्यांचे लसीकरण करण्यात आले सोबतच काही शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी पण आपले लसीकरण करून घेतले. या दरम्यान काही गावकरी मंडळीनी सुद्धा लसीकरण करण्यासाठी या मोहिमे मध्ये सहभाग घेतला. ही लसीकरण मोहीम पूर्णत्वास नेण्यासाठी ग्रामीण रुग्णालय धामणगाव रेल्वे येथील वैद्यकीय चमू आणि रा.से.यो. स्वयंसेवकांनी अथक परिश्रम घेतले.

उद्घाटन सोहळ्याचे व लसीकरण मोहिमेचे संपूर्ण नियोजन रा.से.यो स्वयंसेवकांनी केले. या मध्ये सूत्रसंचालन वैष्णवी राउत व सिमरन तुळसकर यांनी केले, प्रमुख पाहुण्यांचा परिचय नव नियुक्त सहा. कार्यक्रम अधिकारी डॉ. प्रवीण केचे यांनी केले व शेवटी आभार प्रदर्शन अथर्व गावंडे याने केले. चंचल खोत, चंचल पंचबुद्धे, प्रज्वल आरेकर, सुवर्णा वंजारी, भैरवी गांडोळे, साक्षी माळोदे, कृष्णा चांडक, मृणाल सावंत, अनुराधा चांडक, वैष्णवी सौन्दरकर, खुशाली तरेकर, अशा अनेक रा. से. यो. चे वरिष्ठ व कनिष्ठ स्वयंसेवकांनी कार्यक्रम नियोजनात अथक परिश्रम घेतले.

साप्ताहिक

# परतवाडा टाईम्स

संपादक - नरेश तायवाडे | मो. 9552970699 | paratwadatimes@gmail.com | 02-12-2021

## धामणगाव तालुक्यातील ३७ गावामध्ये एकाच वेळी मतदान जनजागृती अभियान

### राष्ट्रीय सेवा योजना आदर्श महाविद्यालयाचा आगळा वेगळा उपक्रम






**धामणगाव रेल्वे | सुयोग देशपांडे**

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती कडून प्राप्त परिपत्रकानुसार, राष्ट्रीय सेवा योजना, आदर्श महाविद्यालय धामणगाव रेल्वे द्वारा महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. वाय. बी. गांडोळे यांच्या मार्गदर्शनाखाली दिनांक 01.11.2021 ते 30.11.2021 या कालावधी दरम्यान मतदार जनजागृती अभियान राबवण्यात आले. या अभियाना दरम्यान विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. हे आयोजन करताना नवीन मतदार विद्यार्थी ज्यांची नावाची नोंद मतदार यादी मध्ये झाली नाही त्यांना केंद्रस्थानी ठेवून विविध कार्यक्रमाचे व उपक्रमाचे महाविद्यालयीन स्तरावर व दत्तक ग्राम स्तरावर आयोजन करण्यात आले. याच उपक्रमाचा एक भाग म्हणून, दिनांक 29.11.2021 ते 30.11.2021 या दरम्यान राष्ट्रीय सेवा योजना धामणगाव रेल्वे विभागाने मतदान जन जागृती चा उपक्रम ३७ गावामध्ये मतदान जन जागृती साठी पॉम्प्लेट वाटप करून पार पाडला. या उपक्रमा दरम्यान 'मतदान मित्र' म्हणून नेमणूक केलेल्या रा. से. यो. स्वयंसेवकांनी महाविद्यालयाच्या प्रत्येक वर्गात जाऊन विद्यार्थ्यांना जनजागृती अभियाना संदर्भात मार्गदर्शन केले व पॉम्प्लेट वितरीत केले. त्या विद्यार्थ्यांनी आपापल्या गावामध्ये जाऊन नवीन मतदार व इतर गावकरी मंडळींना नवीन मतदार नोंदणी व संपूर्ण मतदान प्रक्रिये बद्दल मार्गदर्शन केले व पॉम्प्लेट वितरीत केले. अश्या पद्धतीचा संपूर्ण कार्यक्रम रा से यो दत्तक ग्राम वाढोणा येथे सुद्धा अतिशय चांगल्या पद्धतीने राबवण्यात आला. या कार्यक्रमाच्या यशस्वित करिता रा. से यो चमूतील स्वयंसेवकांनी 'मतदान मित्र' म्हणून अथक परिश्रम घेतले सोबतच महाविद्यालयाच्या बी. ए., बी. कॉम., बी. एस सी., बी. सी. ए., एन. सी. सी. अश्या वेगवेगळ्या विभागातील इतर विद्यार्थ्यांनी सुद्धा या उपक्रमाला अभूतपूर्व प्रतिसाद दिला. या संपूर्ण कार्यक्रमाच्या यशस्विते करिता रा. से यो. सहा. कार्यक्रम अधिकारी डॉ. प्रवीण केचे, महिला कार्यक्रम अधिकारी डॉ. पूनम गहुकर यांनी मोलाचे मार्गदर्शन केले.






साप्ताहिक

# परतवाडा टाईम्स

संपादक - नरेश तायवाडे | मो. 9552970699 | paratwadatimes@gmail.com | 27-11-2021

## आदर्श महाविद्यालयामध्ये संविधान दिना निमित्त मतदान जनजागृती कार्यशाळा संपन्न

### राष्ट्रीय सेवा योजना व राज्यशास्त्र विभागाचा संयुक्त उपक्रम



**धामणगाव रेल्वे | सुयोग देशपांडे**

स्थानिक धामणगाव एज्यूकेशन सोसायटी द्वारा संचालित आदर्श महाविद्यालय येथे संविधान दिवस व मतदान जनजागृती मोहीम २०२१ यांचा सुवर्ण योग साधून राष्ट्रीय सेवा योजना व राज्यशास्त्र विभागा द्वारे आयोजित संविधान दिवस व मतदान जनजागृती कार्यशाळा २६/११/२०२१ रोजी संपन्न झाली. या कार्यक्रमाचे अध्यक्ष स्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. वाय. बी. गांडोळे सर तर प्रमुख अतिथी व मार्गदर्शक म्हणून धामणगाव रेल्वे तहसील येथील नायब तहसीलदार श्री जगदीश मंडपे हे उपस्थीत होते. कार्यक्रमाच्या सुरुवातीला भारतीय संविधानाची उद्देशिकेचे वाचन डॉ. पूनम गहुकर महिला रा. से. यो. कार्यक्रम अधिकारी व सर्व उपस्थितांनी केले. या दरम्यान राज्यशास्त्र विभागाचे प्रमुख प्रा. अमोल बंड यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक व मुख्य अतिथिंचा परिचय देऊन आपल्या विशिष्ट भाषण शैली ने संविधानाची रचना, महत्व आणि सामान्य नागरिकांचे मूलभूत कर्तव्य काय आहे यावर प्रकाश टाकला. नंतर कार्यशाळेची संपूर्ण धुरा प्रमुख अतिथी व मार्गदर्शक म्हणून आलेले श्री जगदीश मंडपे यांनी सांभाळली आणि भारतीय लोकशाहीमध्ये मतदान प्रक्रियेचे काय महत्व आहे ते सर्व उपस्थितांना पटवून दिले. सभागृहामध्ये उपस्थित नवीन मतदार विद्यार्थी यांना मतदानाचा हक्क व मतदाराचे मुख्य कर्तव्ये या बद्दल सखोल मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे अध्यक्षीय भाषण महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. वाय. बी. गांडोळे यांनी केले व भारताचे संविधान आणि मतदान प्रक्रिया याचे महत्व सांगून सर्व उपस्थितांचे मार्गदर्शन केले, या नंतर कु. वैष्णवी ठाकरे व दीपक पचारे या विद्यार्थ्यांनी राष्ट्रीय सेवा योजना अकोला द्वारे आयोजित विद्यापीठ स्तरीय जलसंधारण प्रतिकृती स्पर्धे मध्ये आदर्श महाविद्यालयाचे प्रतिनिधित्व केले या बद्दल त्यांचा प्रमुख अतिथीच्या हस्ते विशेष सत्कार घेण्यात आला. या कार्यक्रमाला महाविद्यालयातील सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी, व नवीन मतदार विद्यार्थी यांनी उपस्थिति दर्शविली. या संपूर्ण कार्यशाळेचे सूत्रसंचालन राष्ट्रीय सेवा योजने च्या स्वयंसेविका कु. भैरवी गांडोळे व कु. साक्षी माळोदे यांनी केले व आभार प्रदर्शन कु. कल्याणी ठाकरे हिने केले. या संपूर्ण कार्यशाळेच्या यशस्विते करिता राष्ट्रीय सेवा योजनेच्या सुवर्ण वंजारी, साक्षी गोडबोले, ऋषभ ठाकरे, पूनम कुरटकर, चंचल खोत, सिमरन तुळसकर, यश सोटे, लाभांषु, प्रज्वल आरेकर, संस्कृती माळोदे, साक्षी गोडबोले, अंकिता तायडे, रेणुका वानखेडे, अर्पिता शर्मा, अथर्व गावंडे अशा अनेक स्वयंसेवकांनी प्रत्यक्ष अप्रत्यक्ष पणे अथक परिश्रम घेतले.






आदर्श महाविद्यालयामध्ये संविधान दिना निमित्त

# मतदान जनजागृती कार्यशाळा

### राष्ट्रीय सेवा योजना व राज्यशास्त्र विभागाचा संयुक्त उपक्रम

**ता.प्रतिनिधी-२७ ( अमरावती दर्शन नेटवर्क )**

**धामणगाव रेल्वे** - स्थानिक धामणगाव एज्यूकेशन सोसायटी द्वारा संचालित आदर्श महाविद्यालय येथे संविधान दिवस व मतदान जन जागृती मोहीम 2021 यांचा सुवर्ण योग साधून राष्ट्रीय सेवा योजना व राज्यशास्त्र विभाग द्वारे आयोजित संविधान दिवस व मतदान जनजागृती कार्यशाळा 26.11.2021 रोजी संपन्न झाली. या कार्यक्रमाचे अध्यक्षीय स्थान महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. वाय. बी. गांडोळे सरांनी व प्रमुख अतिथी व मार्गदर्शक म्हणून धामणगाव तहसील येथील नायब तहसीलदार श्री जगदीश मंडपे यांनी भूषविले.कार्यक्रमाच्या सुरुवातीला भारतीय संविधानाची उद्देशिकेचे वाचन डॉ. पूनम गहुकर महिला रा. से. यो. कार्यक्रम अधिकारी व सर्व उपस्थितांनी केले. या दरम्यान राज्यशास्त्र विभागाचे प्रमुख प्रा. अमोल बंड यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक व मुख्य अतिथी चा परिचय देऊन आपल्या विशिष्ट भाषण शैली ने संविधानाची रचना, महत्व आणि सामान्य नागरिकांचे मूलभूत कर्तव्य काय आहे यावर प्रकाश टाकला. नंतर कार्यशाळेची संपूर्ण धुरा प्रमुख अतिथी व मार्गदर्शक म्हणून आलेले श्री जगदीश मंडपे साहेब यांनी सांभाळली आणि भारतीय लोकशाहीमध्ये मतदान प्रक्रियेचे काय महत्व आहे ते सर्व उपस्थितांना पटून दिले. सभागृहामध्ये उपस्थित नवीन मतदान विद्यार्थी यांना मतदानाचा हक्क व उर्वरित पान २ वर

# 4 गांवों के 111 विद्यार्थी यलो व ऑरेंज बेल्ट उत्तीर्ण



## तहसील में सचिन मुन का कराटे संस्कृति स्थापित करने का प्रयास

**संवाददाता, 23 नवंबर**

**धामणगांव रेलवे**- स्थानीय तहसील में कराटे संस्कृति स्थापित करके युवकों में आत्मरक्षा व नई ऊर्जा का निर्माण करने के लिए सचिन मुन सहित दो शिक्षक भी प्रयास कर रहे हैं. बीते दिनों आदर्श महाविद्यालय के शारीरिक शिक्षा व क्रीड़ा विभाग तथा बोधी बुडोकॉन कराटे इंडिया के संयुक्त तत्वावधान में 14 नवंबर को बालदिन निमित्त कराटे यलो व ऑरेंज बेल्ट के लिए महाविद्यालय में परीक्षा आयोजित की गई थी. परीक्षा के लिए मुख्य परीक्षक कांबळे मुकेश (ब्लैक बेल्ट) सहित आकाश पवार (ब्लैक बेल्ट) व अन्य तीन लोग ब्लैक बेल्ट होल्डर आदिलाबाद (तेलंगाना) से आये थे.

बोधि बुडोकॉन कराटे असोसिएशन के महाराष्ट्र अध्यक्ष सचिन मुन (ब्लैक बेल्ट) मुख्य प्रशिक्षक के रूप में उपस्थित थे. लगभग चार घंटे चली इस परीक्षा में विद्यार्थियों ने अपनी कराटे कला के प्रात्यक्षिक प्रस्तुत किए. उद्घाटन प्रसंग पर महाविद्यालय के प्राचार्य डॉ. योगेंद्र गांडोळे व अन्य मान्यवर उपस्थित थे. दोपहर के सत्र में उत्कृष्ट दर्शन के बाद कु. मधुरा व ईश्वरी ने सुंदर नृत्य प्रस्तुत किए.

जिसके बाद देवगांव की कराटे टीम ने एसिड हमला व प्रत्युत्तर में एक पथनाट्य प्रस्तुत कि या. समापन अवसर पर विद्यार्थियों को बेल्ट व प्रशस्ति प्रमाणपत्र वितरित किए गए. उल्लेखनीय है कि महाविद्यालय की क्रीड़ा संचालक 57 वर्षीय डॉ. माधुरी कोकुलवार ने स्वयं तथा 45 वर्षीय डॉ. नरेंद्र नागपुरे के परिवार के चारों सदस्यों ने ऑरेंज बेल्ट प्राप्त किया. मुख्य प्रशिक्षक सचिन मुन को सेकंड डैन का बेल्ट प्रदान किया गया. कार्यक्रम के सफलतार्थ आयोजकों सहित रोशन वरठी, साहिल कांबळे, मैत्रेयी पाठक, गोपाल पावसे आदि ने अथक प्रयास किए. भविष्य में सभी को मेडिटेशन व कुमिटी भी सिखाए जाने की घोषणा आयोजकों ने की.

## उपचुनाव कार्यक्रम घोषित

**र्ज, 21 दिसम्बर को मतदान**

नामांकन वापस लेने की अवधि तथा 9 दिसम्बर की दोपहर चुनाव चिन्हों का वितरण व उम्मीदवारों की अंतिम सूची जारी की जाएगी. मतदान 21 दिसम्बर को सुबह 7.30 से दोपहर 5.30 तक रहेगा. 22 दिसम्बर को मतगणना तथा चुनाव परिणाम की अधिसूचना जारी करने की तिथि 27 दिसम्बर रहेगी. उपचुनाव के लिए चुनाव निर्णय अधिकारी, मंडल अधिकारी की नियुक्ति की गई है. सहायक चुनाव निर्णय अधिकारी की जिम्मेदारी पटवारी संभाल रहे हैं. नामांकन के साथ जाति प्रमाणपत्र आवश्यक रहेगा. तहसीलदार तथा चुनाव अधिकारी धीरज स्थूल ने यह आदेश दिए हैं.

# चार गावातील 135 पैकी 111 जण येलो व ऑरेंज बेल्ट उत्तीर्ण

## धामणगाव तालुक्यात सचिन मुनचा कराटे संस्कृती रुजविण्याचा स्तुत्य प्रयत्न



**धामणगाव रेल्वे ( वा ) :** स्थानिक तालुक्यात कराटे संस्कृती रुजवून तरुणांमध्ये आत्मरक्षण व नवीन ऊर्जा निर्माण करण्यासाठी सचिन मुन सह 2 शिक्षकसुद्धा प्रयत्न करीत आहेत. अलीकडे धामणगाव शिक्षण संस्था द्वारा संचालित आदर्श महाविद्यालयाच्या शारीरिक शिक्षण व क्रीडा विभाग आणि बोधी बुडोकान कराटे इंडिया यांच्या संयुक्त विद्यमान बालकदिनी कराटे यलो व ऑरेंज बेल्ट साठी परीक्षा महाविद्यालयात आयोजित करण्यात आली. या परीक्षेसाठी मुख्य परीक्षक माननीय कांबळे मुकेश कुमार ब्लॅक बेल्ट 7Dan सह आकाश पवार ब्लॅक बेल्ट 4Dan व 3 इतर जण ब्लॅक बेल्ट होल्डर अदिलाबाद तेलंगणा येथून आले होते.

बोधी बुडोकान कराटे असोसिएशनचे महाराष्ट्र अध्यक्ष सचिन मुन ब्लॅक बेल्ट 2Dan हे मुख्य प्रशिक्षक व सचिव शिलानंद झांबरे हे सुद्धा परीक्षक म्हणून उपस्थित होते. तब्बल 4 चार तास चाललेल्या या परीक्षेमध्ये विद्यार्थ्यांनी आपले कराटे कला व प्रात्यक्षिक सादरीकरण केले. उद्घाटन प्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ योगेंद्र गांडोळे व अन्य मान्यवर यांनी रीतसर दीपप्रज्वलन करून कार्यक्रमाची सुरुवात केली. दुपारच्या सत्रात उत्कृष्ट प्रदर्शन केल्यानंतर कु. मधुरा व ईश्वरी या मुलींनी सुंदर नृत्य सादर केले व विद्यार्थ्यांनी चित्तवेधक मनोरे बनवून प्रेक्षकांचे लक्ष वेधले. उपस्थित सर्वांना भोजन व्यवस्था करण्यात आली होती. त्यानंतर देवगाव च्या कराटे चमूने एसिड हल्ला व प्रत्यूत्तर प्रसंगी एक पथनाट्य सादर केले. समापन प्रसंगी विद्यार्थ्यांना बेल्ट व प्रशस्ती प्रमाणपत्र वितरित करण्यात आले. या कार्यक्रमातील विशेष म्हणजे महाविद्यालयातील क्रीडा संचालक 57 वर्षीय डॉ माधुरी कोपुलवार यांनी स्वत: व 45 वर्षीय डॉ नरेंद्र नागपुरे यांच्या कुटुंबातील चारही सदस्यांनी ऑरेंज बेल्ट प्राप्त केला. मुख्य प्रशिक्षक सचिन मुन यांना 2nd Dan चा बेल्ट देण्यात आला. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी आयोजकासह रोशन वरठी, साहिल कांबळे, मैत्रेयी पाठक, गोपाल पावसे, आकाश महात्मे, यांचेसह श्रद्धा नागपुरे, डॉ पूनम गहुकर, कु. प्रीती चिरडे व 20 इतर विद्यार्थ्यांनी खूप प्रयत्न केले.यापुढे सर्वांना मेडिटेशन व कुमिटी सुद्धा शिकविल्या जाणार आहे, असें आयोजकांनी जाहिर केले.

---

अमरावती, शनिवार २० नोव्हेंबर २०२१ २

# आदर्श महाविद्यालयात रोल ऑल युथ इन क्राइम प्रिवेंशन अँड लीगल अवेयरनेस कार्यशाळा

## दामिनी क्लबचे आयोजन

**ता.प्रतिनिधी-२० नोव्हेंबर**

**धामणगाव रेल्वे :** धामणगाव शिक्षण संस्थेद्वारा संचालित आदर्श महाविद्या याच्या दामिनी क्लबच्या वतीने दिनांक 17/11/2021 रोजी रोल ऑफ यूथ इंन क्राईम प्रिव्हेन्शन अंड लीगल अवेअरनेस या विषयावर कार्यशाळा आयोजित करण्यात आली या कार्यशाळेच्या प्रथम सत्रात विषय तज्ञ प्रवीण खानपासोळे यांनी सायबर क्राईम या विषयावर अतिशय उत्तम उदाहरणाद्वारे सादरीकरण केले तर दुसऱ्या सत्रामध्ये ज्योती खानपासोळे यांनी गुन्हेगारी प्रवृत्ती वर कशाप्रकारे मात करता येईल त्यासाठीचे उपयोगी मार्गदर्शन केले या कार्यशाळेच्या उद्घाटन प्रसंगी मंचावर अध्यक्ष म्हणून महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ योगेंद्र गांडोळे उपस्थित होते व त्यांनी विद्यार्थ्यांना अतिशय मोलाचे मार्गदर्शन केले ,सदर कार्यशाळा दामिनी क्लबच्या समन्वयक डॉ माधुरी कोपुलवार यांच्या मार्गदर्शनात आयोजित करण्यात आली कार्यशाळेची सुरुवात मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलनाने करण्यात आली कार्यशाळेसाठीचे सूत्रसंचालन प्रा डॉ.श्वेता शर्मा यांनी केले तर प्रास्ताविक डॉ.माया मावळे यांनी केले. कार्यशाळेचे रिसोर्स पर्सन प्रवीण खानपासोळे यांचा परिचय डॉ. शिल्पा विधळे तर ज्योती खानपासोळे यांचा परिचय व आभार डॉ .पूनम गहूकर यांनी केले . उपरोक्त कार्यशाळेच्या यशस्वितेसाठी विशेष परिश्रम प्रा .श्रीकांत पाटील ,प्रा.डॉ. सौरभ घोगरे यांनी घेतले. कार्यक्रमांमध्ये एकूण 270 विद्यार्थी सहभागी झालेत कार्यशाळेचा मुख्य उद्देश हा विद्यार्थ्यांना सायबर क्राईम व त्याबाबतची जागरूकता करून देणे हा होता गुन्हे म्हणजे काय त्याची सुरुवात होण्याची कारणे याबद्दलची विस्तृत चर्चा करण्यात आली तसेच कायद्यातील याबाबतच्या विविध कलमा बद्दल विद्यार्थ्यांना सविस्तर माहिती देण्यात आली यावेळी विद्यार्थ्यांसाठी खुल्या मंचाचे आयोजन करण्यात आले होते पावर पॉइंट प्रेझेंटेशन द्वारे त्यांना प्रत्येक कायदा त्यातील तरतुदी व शिक्षा याबद्दलची विस्तृत माहिती देण्यात आली तसेच दिशा संस्था याबाबत कशी सक्रिय आहे याचेही प्रात्यक्षिक दाखवण्यात आले विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासामध्ये सायबर गुन्हे अडथळा ठरून त्यांचे भविष्य अंधकाराकडे झुकले जाते त्यामुळे विद्यार्थ्यांनी याबाबतची जाणीव जागृती व जबाबदारी समजावून घेणे आवश्यक आहे असे प्रतिपादन कार्यशाळेचे विषय तज्ञ प्रवीण खानपासोळे व ज्योती खानपासोळे यांनी केले यावेळेस विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद पहावयास मिळाला कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी एन एस एस व बी .एस.सी च्या विद्यार्थ्यांनी सहकार्य केले. अनुराग चौबे ,यश धाडसे ,अभिषेक मानके ,संकल्प गोलाईत हे विद्यार्थी खुल्या चर्चेत चर्चासत्रात सहभागी झाले व त्यांच्या शंकांचे निरसन तज्ञांनी केले.

---

आपल्या शहरातील प्रत्येक बातमी | आता रोज रहा अपडेट! | अध्ययन समाचार | संपादक : जितेंद्र रोडे | आज जयंती ! गुरुनानक देव जी
कार्यालय : ब्राम्हणसभा कॉलनी, डॉ. गजभे यांच्या दवाखान्या समोर, लाकुड बाजार, परतवाडा. जि. अमरावती 444 805 | भ्रमणध्वनी : 9422158005 | दुरध्वनी : 07223-222005 | jitendrarode77@gmail.com | Adhayayn Samachar
शुक्रवार दि. १९ नोव्हेंबर २०२१

# आदर्श महाविद्यालयात रोल ऑफ युथ इन क्राइम प्रिवेंशन अ‍ॅन्ड लीगल अवेयरनेस कार्यशाळा संपन्न

**धा.रेल्वे दि. १९ | प्रज्योत पहाडे**





धामणगाव शिक्षण संस्थेद्वारा संचालित आदर्श महाविद्यालयाच्या दामिनी क्लबच्या वतीने दि. १७ नोव्हेंबर रोजी रोल ऑफ यूथ इंन क्राईम प्रिव्हेन्शन अंड लीगल अवेअरनेस या विषयावर कार्यशाळा आयोजित करण्यात आली.

या कार्यशाळेच्या प्रथम सत्रात विषय तज्ञ प्रवीण खानपासोळे यांनी सायबर क्राईम या विषयावर अतिशय उत्तम उदाहरणाद्वारे सादरीकरण केले तर दुसऱ्या सत्रामध्ये ज्योती खानपासोळे यांनी गुन्हेगारी प्रवृत्ती वर कशाप्रकारे मात करता येईल त्यासाठीचे उपयोगी मार्गदर्शन केले. या कार्यशाळेच्या उद्घाटन प्रसंगी मंचावर अध्यक्ष म्हणून महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. योगेंद्र गांडोळे उपस्थित होते व त्यांनी विद्यार्थ्यांना अतिशय मोलाचे मार्गदर्शन केले.

सदर कार्यशाळा दामिनी क्लबच्या समन्वयक डॉ. माधुरी कोपुलवार यांच्या मार्गदर्शनात आयोजित करण्यात आली. कार्यशाळेची सुरुवात मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलनाने करण्यात आली. कार्यशाळेसाठीचे सूत्रसंचालन प्रा.डॉ. श्वेता शर्मा यांनी केले तर प्रास्ताविक डॉ.माया मावळे यांनी केले. कार्यशाळेचे रिसोर्स पर्सन प्रवीण खानपासोळे यांचा परिचय डॉ. शिल्पा विधळे तर ज्योती खानपासोळे यांचा परिचय व आभार डॉ .पूनम गहूकर यांनी केले. उपरोक्त कार्यशाळेच्या यशस्वितेसाठी विशेष परिश्रम प्रा. श्रीकांत पाटील, प्रा.डॉ. सौरभ घोगरे यांनी घेतले.

कार्यक्रमांमध्ये एकूण २७० विद्यार्थी सहभागी झालेत कार्यशाळेचा मुख्य उद्देश हा विद्यार्थ्यांना सायबर क्राईम व त्याबाबतची जागरूकता करून देणे हा होता. गुन्हे म्हणजे काय त्याची सुरुवात होण्याची कारणे याबद्दलची विस्तृत चर्चा करण्यात आली. तसेच कायद्यातील याबाबतच्या विविध कलमा बद्दल विद्यार्थ्यांना सविस्तर माहिती देण्यात आली. यावेळी विद्यार्थ्यांसाठी खुल्या मंचाचे आयोजन करण्यात आले होते. पावर पॉइंट प्रेझेंटेशन द्वारे त्यांना प्रत्येक कायदा त्यातील तरतुदी व शिक्षा याबद्दलची विस्तृत माहिती देण्यात आली. तसेच दिशा संस्था याबाबत कशी सक्रिय आहे याचेही प्रात्यक्षिक दाखवण्यात आले.

विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासामध्ये सायबर गुन्हे अडथळा ठरून त्यांचे भविष्य अंधकाराकडे झुकले जाते त्यामुळे विद्यार्थ्यांनी याबाबतची जाणीव जागृती व जबाबदारी समजावून घेणे आवश्यक आहे असे प्रतिपादन कार्यशाळेचे विषय तज्ञ प्रवीण खानपासोळे व ज्योती खानपासोळे यांनी केले. यावेळेस विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद पहावयास मिळाला कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी एनएसएस व बी.एस.सी च्या विद्यार्थ्यांनी सहकार्य केले. अनुराग चौबे, यश धाडसे, अभिषेक मानके, संकल्प गोलाईत हे विद्यार्थी खुल्या चर्चेत चर्चासत्रात सहभागी झाले व त्यांच्या शंकांचे निरसन तज्ञांनी केले.

सौरभ मल्टिसर्व्हीसेस
भारतीय स्टेट बँक ग्राहक सेवा केंद्र
पैसे काढणे, पैसे टाकणे, मनी ट्रान्सफर, स्टेट बँकेचे खाते काढून मिळेल
स्टेट बँक नि:शुल्क सेवा, सर्व प्रकारचे ऑनलाईन फॉर्म भरून मिळेल
स्पर्धा परिक्षा फॉर्म, पॅन कार्ड, आधार कार्ड, LIC प्रिमीयम भरल्या जाईल
मालधुरे फर्निचर
सर्व प्रकारचे सागवानी फर्निचर उपलब्ध
सोफा सेट, मंदिर, बॉक्स दिवाण, डायनिंग टेबल
लाकुड बाजार, गोतमारे हॉस्पिटल समोर, अचलपूर रोड, परतवाडा | 8888502450, 8208936572

---

आपल्या शहरातील प्रत्येक बातमी | आता रोज रहा अपडेट! | अध्ययन समाचार | संपादक : जितेंद्र रोडे | आज जयंती भगवान पार्श्वनाथ जयंती
कार्यालय : ब्राम्हणसभा कॉलनी, डॉ. गजभे यांच्या दवाखान्या समोर, लाकुड बाजार, परतवाडा. जि. अमरावती 444 805 | भ्रमणध्वनी : 9422158005 | दुरध्वनी : 07223-222005 | jitendrarode77@gmail.com | Adhayayn Samachar
बुधवार दि.२९ डिसेंबर २०२१

## संस्कृत विभागाचा वैविध्यपूर्ण संस्कृत उपक्रम

# विविध सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन

**धा.रेल्वे दि.२९ प्रज्योत पहाडे**



स्थानिक आदर्श विज्ञान जे.बी. कला व बिरला वाणिज्य महाविद्यालय धामणगाव रेल्वे येथील संस्कृत विभागाच्या वतीने विद्यार्थ्यांसाठी "वैविध्यपूर्ण संस्कृत उपक्रम:"अंतर्गत विविध सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. विद्यार्थ्यांनी संस्कृत मध्ये सूत्रसंचालन, गीत गायन, शास्त्रीय नृत्य, काव्यवाचन स्पर्धा, सुभाषित स्पर्धा व लघुनाट्य "सौंदर्यवती भव" इत्यादी उत्कृष्ट उपक्रम सादर केले. विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास वाढावा व संस्कृत मध्ये त्यांना बोलता यावं, लिहिता, वाचता व सुबोध संस्कृत संभाषण करता यावं, यासाठी विद्यार्थ्यांना संस्कृत व्यासपीठ उपलब्ध करून देण्याचा उद्देश या कार्यक्रमाच्या मागचे आयोजन आहे. असे मत संस्कृत विभाग प्रमुख डॉ पुनम गहुकर यांनी व्यक्त केले. सदर कार्यक्रमाचे प्राचार्य डॉ योगेंद्र गांडोळे यांनी अध्यक्षस्थान भूषविले. मार्गदर्शन करताना संस्कृत भाषा ही आधुनिक काळाची गरज असून Data base Computer च्या निर्मिती साठी संस्कृत भाषा शिकणे अनिवार्य आहे. जगभरात त्या भाषेविषयी खूप काम सुरू आहे. विद्यार्थ्यांनी Additional Language म्हणून संस्कृत नक्की शिका, असे त्यांनी आवाहन केले. कला शाखा विभागप्रमुख व अर्थशास्त्र विभाग प्रमुख डॉ. दीपक शृंगारे यांनी प्रमुख अतिथी म्हणून कार्यक्रमाला उपस्थित होते व स्पर्धेचे मुख्य परीक्षक इंग्रजी विभाग प्रमुख डॉ. संजय पाटील सर व सांस्कृतिक समितीचे समन्वयक प्रा.जितेंद्र बारूळकर यांनी कार्यक्रमाचे मुख्य धुरा सांभाळली. कार्यक्रमाचे सुत्रसंचलन शिवानी रामटेके व नेहा लांबाडे यांनी केले. आभार प्रदर्शन मयुरी अर्मळ हिने केले असून, विविध सांस्कृतिक प्रस्तुती राखी वैद्य, कांचन ढवळे, वैष्णवी कोहरे, रूपाली काळे, पायल मानकर, प्रतिक्षा उरकुडे, मुस्कान शेख, वैष्णवी नवरंगे, प्राची ठाकरे इ. विद्यार्थ्यांनी कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी अथक प्रयत्न केले. कार्यक्रमाला महाविद्यालयातील इतिहास विभाग प्रमुख डॉ.बारापात्रे राज्यशास्त्र विभागाचे प्रा. बंड, क्रीडा विभाग प्रमुख डॉ. माधुरी कोपुलवार, डॉ. चिंचमलातपुरे, संगणक विभाग प्रमुख डॉ. माया मावळे, गणित विभागाच्या डॉ. अश्विना रंगारी व भौतिकशास्त्र विभागाच्या डॉ. शिल्पा विधळे व डॉ. श्वेता शर्मा आणि इतर विभागीय प्राध्यापक वृंद व विद्यार्थी मोठ्या संख्येने व प्रामुख्याने उपस्थित होते.

पंकज सोलर सिस्टीम यांचे
सोहम बॅटरी हाऊस
SOHAM BATTERY HOUSE
यापेक्षा स्वस्त कुठेही नाही
AMARON PIT STOP
अॅमरॉन एक्सक्ल्युझिव्ह शॉपी
मदन महल, दुकान नं. 129, परतवाडा | मो. 9822527216, 9850682209

आपल्या शहरातील प्रत्येक बातमी
SOCIAL MEDIA EDITION
|| श्रीकृष्णम् वंदे जगतगुरुम् ||
अध्ययन समाचार
आता रोज रहा अपडेट!
संपादक : जितेंद्र रोडे
आयुष्यात शिक्षण तुम्हाला फक्त मार्ग दाखवू शकते पण मेहनत तुम्हाला ध्येयापर्यंत पोहोचवू शकते
कार्यालय : ब्राम्हणसभा कॉलनी, डॉ. गजभे यांच्या दवाखान्या समोर, लाकुड बाजार, परतवाडा. जि. अमरावती 444 805
भ्रमणध्वनी : 9422158005 दुरध्वनी : 07223-222005
jitendrarode77@gmail.com | Adhayayn Samachar
गुरुवार दि. ३० डिसेंबर २०२१

## आदर्श विज्ञान, ज.भा. कला व बिरला वाणिज्य महाविद्यालय मधमाशी पालव्यवसायावर उद्योजकता विकास कार्यक्रम

**धा.रेल्वे दि.३० प्रज्योत पहाडे**




विद्यार्थ्यांना वाणिज्य शिक्षण घेताना उद्योजक बनविण्याच्या उद्देशाने आदर्श महाविद्यालय, धामणगाव रेल्वे येथे वाणिज्य विभागाचे वाणिज्य मंडळ द्वारा 'मधमाशी पालन व्यवसायावर उद्योजकता विकास कार्यक्रम' आयोजित करण्यात आला. सदर कार्यक्रमास ग्रामोपयोगी विज्ञान केंद्र, दत्तापुर, वर्धा चे मास्टर प्रशिक्षक चंद्रशेखर सोनटक्के प्रमुख वक्ता व अतिथी म्हणून उपस्थित होते. कार्यक्रमाचे अध्यक्षपद महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. योगेंद्र गांडोळे यांनी भूषविले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व परिचय डॉ नरेन्द्र नागपुरे यांनी केला. प्रमुख वक्त्याने थोड्याश्या जागेत मधमाशी पालन व व्यवसायाच्या संधी यावर बि.कॉम द्वितीय व तृतीय वर्षीय विद्यार्थ्यांना सुंदर मार्गदर्शन केले व महाविद्यालयासोबत सामंजस्य करारांतर्गत या उपक्रमात आपण याचे १५ दिवसीय प्रशिक्षण देण्याचे आश्वासन दिले. आजच्या काळात विद्यार्थ्यांना स्वयंपूर्ण व आत्मनिर्भर अश्या व्यवसायासाठी कश्या तयारीची गरज आहे यावर उपयुक्त मार्गदर्शन केले. सदर कार्यक्रमाला यशस्वीपणे राबविण्यासाठी वाणिज्य मंडळ चे पदाधिकारी मोहित गोहणे, रोहन चौधरी, वैष्णवी राऊत, ऋषभ ठाकरे, सुमित भाग्यवंत, मनोज धांडे अश्या सर्व विद्यार्थ्यांनी परिश्रम घेतले. कु.चंचल पंचबुद्धे, रीना कुमरे हिने संचलन केले आणि कु. चंचल खोत हिने आभार प्रदर्शन केले. या कार्यक्रमाला वाणिज्य विभाग प्रमुख डॉ.आनंद नरांजे, डॉ.रुपेश डाहाके, प्रा.जितेंद्र बारुळकर, प्रा.नितीन सिंघवी, प्रिया रुपवने, मेघा पनपालिया, सलोनी मासुरकर सह १५० विद्यार्थ्यांनी उपस्थिती दर्शविली.

आपल्या शहरातील प्रत्येक बातमी
SOCIAL MEDIA EDITION
|| श्रीकृष्णम् वंदे जगतगुरुम् ||
अध्ययन समाचार
आता रोज रहा अपडेट!
संपादक : जितेंद्र रोडे
भरलेला खिसा माणसाला दुनिया दाखवतो रिकामा खिसा मात्र दुनियेतील माणसं दाखवतो
कार्यालय : ब्राम्हणसभा कॉलनी, डॉ. गजभे यांच्या दवाखान्या समोर, लाकुड बाजार, परतवाडा. जि. अमरावती 444 805
भ्रमणध्वनी : 9422158005 दुरध्वनी : 07223-222005
jitendrarode77@gmail.com | Adhayayn Samachar
मंगळवार दि. ११ जानेवारी २०२२

## १२ जानेवारी युवक दिना निमित्त आदर्श महाविद्यालयात भव्य रक्तदान शिबिर

**धा.रेल्वे दि.११ प्रज्योत पहाडे**

स्थानिक धामणगाव रेल्वे येथील धामणगाव एज्यूकेशन सोसायटी द्वारा संचालित आदर्श महाविद्यालय येथे दरवर्षी 12 जानेवारी युवक दिन अर्थात स्वामी विवेकानंद जयंतीच्या निमित्ताने भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन महाविद्यालयाच्या सभागृह मधे करण्यात आले आहे.




सदर रक्तदानाचे हे पंचविसावे वर्ष असल्याने अधिकाधिक तरुण युवा वर्गांने या कोरोणा महामारीच्या काळात रक्तदान करुण स्वामी विवेकानंद यांना अभिवादन अर्पण करावे असे प्रतिपादन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ योगेंद्र गांडोळे यांनी केले आहे. रक्तदानाला सकाळी 10.30 वाजता सुरुवात होणार असून 1.30 वाजेपर्यन्त राहणार आहे. रक्तदान करिता येत असताना कोरोणा नियमांचे काटेकोर पालन करुण यावे. सोशल डिस्टनसिंग व मास्क आवश्यक असणार आहे.येताना एक डोनर सोबत घेऊन येण्याचा प्रयत्न करावा.रक्तदान हे आपले राष्ट्रीय कर्तव्य असल्याने ते सर्वांनी मिळून पार पाडावे असे आवाहन राष्ट्रिय सेवा योजना व समस्त आदर्श महाविद्यालय परिवार यांच्याकडून करण्यात आले आहे.




नवराष्ट्र

## आदर्श महाविद्यालयात सावित्रीबाई फुले जयंती




**धामणगाव रेल्वे,(वा.).** स्थानिक आदर्श विज्ञान ज. भा. कला व बिरला वाणिज्य महाविद्यालयात 3 जानेवारी रोजी सावित्रीबाई फुले यांच्या जन्मदिनाचा कार्यक्रम पार पडला. स्त्रीमुक्ती दिन महाविद्यालयातील दामिनी क्लब व इतिहास विभागाच्या वतीने प्राचार्य डॉ. योगेंद्र गांडोळे यांचे अध्यक्षतेखाली घेण्यात आला.

या कार्यक्रमाप्रसंगी चांदूर रेल्वे येथील अशोक महाविद्यालयाच्या इतिहास विभाग प्रमुख प्रा. डॉ. माया वानखेडे प्रमुख मार्गदर्शक म्हणून लाभल्या होत्या. प्रमुख अतिथी म्हणून परतवाडा येथील शासकीय काष्ट आगार अधिकारी अमृता अविनाश गजभिये उपस्थित होत्या. यावसंगी प्रा. डॉ. माया वानखेडे यांनी मार्गदर्शनात प्राचीन कालखंडापासून स्त्री विकासाच्या कार्याचा आढावा घेतला. प्रमुख अतिथी अमृता गजभिये यांनी सावित्रीबाई फुले यांच्या कार्याचा गौरव करून सावित्रीबाई फुले यांचे विचार प्रत्येक स्त्रीने आचरणात आणण्याचे आवाहन केले. त्यांनी सादर केलेल्या सावित्रीबाई फुले यांच्या जीवनावरील एकपात्री प्रयोगाने सर्व श्रोते मंत्रमुग्ध झाले होते. यावेळी प्रा. डॉ. शिल्पा विधळे यांनी सावित्रीबाई फुले यांच्या जीवनावरील स्वतः रचलेली कविता सादर केली. प्राचार्य डॉ. योगेंद्र गांडोळे यांनी अध्यक्षीय मार्गदर्शनात तत्कालीन काळातील फुले दाम्पत्याचे स्त्री शिक्षण व विकासाचे कार्य अतिशय महान असून ते आज जरी नसले तरी त्यांचे कार्यकर्तृत्व अजरामर झाल्याचे सांगितले. प्रास्ताविक दामिनी क्लबच्या समन्वयक प्रा.डॉ.माधुरी कोपुलवार, पाहुण्यांचा परिचय इतिहास विभाग प्रमुख प्रा. डॉ. किशोर बारापात्रे व दामिनी क्लबच्या सदस्या प्रा. डॉ. माया मावळे यांनी करून दिला. संचालन प्रा. डॉ. अश्विना रंगारी यांनी तर आभार प्रा. डॉ. पूनम गहुकर यांनी मानले. यावसंगी कार्यक्रमाला प्रा. डॉ. श्वेता शर्मा, प्रा. डॉ. शिल्पा विधळे, प्रा. डॉ. दीपक शृंगारे, प्रा. डॉ. संजय पाटील, प्रा. डॉ. अजय चिंचमलातपुरे प्रा. जितेंद्र बारुडकर, प्रा. डॉ. फुरकान पठाण तसेच दामिनी क्लबच्या सर्व सदस्या महाविद्यालयातील शिक्षक बंधू-भगिनी तसेच विद्यार्थी वर्ग बहुसंख्येने उपस्थित होते.

Amravati Plus Edition
09 January 2022 Page No. 3
epaper.navarashtra.com

## आदर्श महाविद्यालय में आज भव्य रक्तदान शिविर

### युवा दिवस पर आयोजन

**धामणगांव रेल्वे। मंगल प्रहर संवाददाता**



स्थानीय धामणगांव एज्युकेशन व्दारा संचालित आदर्श महाविद्यालय में हर वर्ष की तरह इस वर्ष भी बुधवार 12 जनवरी को युवक दिन अर्थात स्वामी विवेकानंद जयंती के उपलक्ष्य में भव्य रक्तदान शिविर का आयोजन किया गया है। महाविद्यालय के सभागृह में आयोजित इस रक्तदान शिविर में सहभागी होकर स्वामी विवेकानंद को अभिवादन अर्पण करने की अपील प्राचार्य डॉ. योगेश गाडोले, राष्ट्रीय सेवा योजना व्दारा की गई।

आपल्या शहरातील प्रत्येक बातमी
SOCIAL MEDIA EDITION
अध्ययन समाचार
आता रोज रहा अपडेट!
संपादक : जितेंद्र रोडे
"शिक्षणावर केलेली गुंतवणूक उत्तम व्याज मिळवून देते."
कार्यालय : ब्राम्हणसभा कॉलनी, डॉ. गजभे यांच्या दवाखान्या समोर, लाकुड बाजार, परतवाडा. जि. अमरावती 444 805
भ्रमणध्वनी : 9422158005 | दूरध्वनी : 07223-222005
jitendrarode77@gmail.com | Adhayayn Samachar
मंगळवार दि. १८ जानेवारी २०२२

वाणिज्य विभागाचा स्तुत्य उपक्रम

## भविष्याचा वेध' घेणारे ५ वे राज्यस्तरीय सेमिनार चे आयोजन

था.रेल्वे दि. १८ | प्रज्योत पहाडे



भविष्यात तंत्रज्ञानमध्ये होणारे बदल समजून घेण्यासाठी व विद्यार्थांमध्ये भविष्यकालीन दृष्टिकोन विकसित करण्याच्या हेतूने आदर्श महाविद्यालयाच्या वाणिज्य विभागाने "भविष्याचा वेध- Future is Calling" या विषयावर ५ वे राज्यस्तरीय पावर पॉइंट प्रेझेंटेशन स्पर्धा २०२१ दि. ७ जानेवारी २०२२, शुक्रवार रोजी आयोजित करण्यात आली होती.

ही राज्यस्तरीय स्पर्धा गत पाच वर्षापासून वाणिज्य विभागातर्फे महाविद्यालयात सातत्याने आयोजित करण्यात येते आहे. या वर्षाच्या स्पर्धेचा विषय "Future is calling- भविष्याचा वेध" हा होता. या अंतर्गत 'भविष्यातील वाहतूक', 'अवकाश संशोधन', 'ऊर्जा संभाव्यता', 'क्रीप्टोकरन्सीचे भविष्य' आणि 'आरोग्य सेवेतील प्रवाह' या विषयावर एकूण सहभागी १३० विद्यार्थ्यांपैकी ४० जणांनी आपले PPT प्रदर्शन सादर करीत उत्स्फूर्त सहभाग नोंदविला.

या कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. योगेन्द्र गांडोळे, प्रमुख पाहुणे ॲड. आशिष राठी, सचिव, धामणगाव एज्युकेशन सोसायटी हे होते. राठी यांनी आपल्या संबोधनात 'फ्लेयर' हि राज्यस्तरीय पॉवरपॉइंट प्रेझेंटेशन स्पर्धा प्रासंगिक तसेच विद्यार्थ्यांना भविष्याचा वेध घ्यायला लावून त्यांच्यामध्ये संशोधक वृत्ती व त्यांच्या व्यक्तिमत्व विकासावर सकारात्मक प्रभाव निर्माण करण्याचा एक उत्तम मंच आहे असे मत व्यक्त केले. या प्रकारचे उपक्रम सातत्याने राबवणे हि काळाची गरज असून त्याकरिता धामणगाव शिक्षण संस्था सर्वतोपरीने मदत करेल असे त्यांनी आश्वासन दिले. कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. गांडोळे यांनी या स्पर्धेचा विद्यार्थ्यांनी संभाषण कौशल्य वृद्धिंगत करण्यासाठी मोठ्या प्रमाणात उपयोग करून जीवनात यशस्वी होण्याचा मंत्र दिला.

या स्पर्धेत प्रथम पुरस्कार कु. साक्षी भेंडे भारतीय महाविद्यालय, अमरावती, द्वितीय पुरस्कार कु. सुखदा हरणे विद्याभारती महाविद्यालय, अमरावती, तृतीय पुरस्कार कु. हर्षिता धाबलिया भारतीय महाविद्यालय, अमरावती, उत्तेजनार्थ पुरस्कार क्रमशः कु.लेखा कोठारी, कु.समीक्षा ठाकरे दोन्ही आदर्श महाविद्यालय, धामणगाव रेल्वे व यश चौधरी भारतीय महाविद्यालय, अमरावती यांनी प्राप्त केले.

या स्पर्धेचे प्रास्ताविक विभाग प्रमुख व IQAC समन्वयक डॉ. आनंद नरांजे, पाहुण्यांचा परिचय प्रा. नितीन सिंघवी, आभार प्रदर्शन डॉ. नरेंद्र नागपुरे व संचालन प्रा.जितेंद्र बारूळकर यांनी केले. या कार्यक्रमाला यशस्वीपणे राबवण्यासाठी डॉ. रुपेश डाहाके, प्रा. श्रीकांत पाटील, कु. प्रिया रुपवणे, कु.मेघा पनपालिया, कु. सलोनी मासुरकर, वसंत तायडे यांनी अथक परिश्रम घेतले.

या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी वाणिज्य विभागातील वाणिज्य मंडळाचे सर्व सभासद व महाविद्यालयाच्या परिवारातील सर्व सभासदांचा मोलाचा वाटा होता.

आपल्या शहरातील प्रत्येक बातमी
SOCIAL MEDIA EDITION
अध्ययन समाचार
आता रोज रहा अपडेट!
संपादक : जितेंद्र रोडे
मकर संक्रांत निमित्त हार्दिक शुभेच्छा !
कार्यालय : ब्राम्हणसभा कॉलनी, डॉ. गजभे यांच्या दवाखान्या समोर, लाकुड बाजार, परतवाडा. जि. अमरावती 444 805
भ्रमणध्वनी : 9422158005 | दूरध्वनी : 07223-222005
jitendrarode77@gmail.com | Adhayayn Samachar
शुक्रवार दि. १४ जानेवारी २०२२

## राष्ट्रीय सेवा योजना, आदर्श महाविद्यालयाद्वारे आयोजित रक्तदान शिबिराला उस्फुर्त प्रतिसाद

था.रेल्वे दि. १४ | प्रज्योत पहाडे



गेल्या २५ वर्षापासून सुरू असलेली परंपरा धामणगाव एज्युकेशन सोसायटी द्वारा संचालित, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती सोबत संलग्नित आदर्श विज्ञान, ज. भा. कला व बिरला वाणिज्य महाविद्यालय येथे दिनांक १२ जानेवारी २०२२ रोजी भव्य रक्तदान शिबिर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. योगेंद्र गांडोळे यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडले.

या शिबिराला धामणगाव एज्युकेशन सोसायटी चे पदाधिकारी यांची उपस्थिति लाभली. या रक्तदान शिबिराचे उद्घाटन अध्यक्ष ॲड. रमेशचंद्र चांडक यांच्या हस्ते पार पडले. त्यांच्या सोबत ॲड. आशिषकुमार राठी, रमेशचंद्र पसारी, प्रदिपकुमार लुणावत, धामणगाव रक्तदान समिती चे अध्यक्ष चेतन कोठारी व महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. वाय.बी. गांडोळे यांची उपस्थिति होती.

या संपूर्ण उद्घाटन सोहळ्याचे सूत्रसंचालन सहाय्यक प्राध्यापक जितेंद्र सुर्यवंशी यांनी आपल्या अनोख्या शैलीत केले व उपस्थितांची मने जिंकली. शिबिराची सुरुवात स्वामी विवेकानंद यांच्या प्रतिमेला पदाधिकाऱ्यांच्या हस्ते पूजन करून झाले. सदर रक्तदान शिबिरासाठी जवाहरलाल नेहरू वैद्यकिय महाविद्यालय सावंगी मेघे, वर्धा येथून रक्तदान पेढी चे प्रमुख डॉ. सुनील चावरे यांच्या मार्गदर्शनाखाली त्यांची चमू उपस्थित होती.

या रक्तदान शिबिराला ८४ रक्तदाते म्हणून लाभले त्यांच्या कडून ७१ यूनिट रक्त पेढी ला मिळाले. रक्तदान पेढी चे प्रमुख डॉ. सुनील चावरे यांनी या कोरोना काळात सुद्धा महाविद्यालय व इतर शैक्षणिक संकुल बंद असूनही तरुणाई चा उस्फुर्त सहभाग बघून आश्चर्य व्यक्त केले. या शिबिराच्या सुरुवातीला धामणगाव एज्युकेशन सोसायटी चे अध्यक्ष ॲड. चंद्रशेखर चांडक यांनी आपले मनोगत व्यक्त केले व राष्ट्रीय सेवा योजना आदर्श महाविद्यालय धामणगाव यांच्या कडून युवक दिना निमित्त आयोजित रक्तदान शिबिराचे उत्कृष्ट रित्या केलेल्या आयोजनाची स्तुति केली व सोसायटी तर्फे सर्वांचे अभिनंदन केले. २५ वर्षापासून सतत चालू असलेली ही रक्तदान शिबिर आयोजनाची परंपरा अजूनही चालू आहे याचे आश्चर्य व्यक्त करून पुढील भावी वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. त्यानंतर संपूर्ण रक्तदाते व सावंगी मेघे वर्धा येथून आलेल्या रक्त पेढी चे धामणगाव एज्युकेशन सोसायटी च्या वतीने धन्यवाद मानले. रक्तदानाची सुरुवात महाविद्यालयाचे सहाय्यक प्राध्यापक व वाणिज्य विभाग येथे कार्यरत, माजी रा.से.यो. कार्यक्रम अधिकारी डॉ. नरेंद्र नागपुरे यांनी आपले रक्तदान करून केली व शेवट हा याच महाविद्यालयाचे सहयोगी प्राध्यापक, अर्थशास्त्र विभाग प्रमुख डॉ. दीपक शृंगारे यांनी केला. सोबतच महाविद्यालयाच्या इतर शिक्षक, रा.से.यो., रा. छा. से., महाविद्यालयीन आजी व माजी विद्यार्थी, धामणगाव वासी, पत्रकार बंधु व इतर गावकरी मंडळी यांनी रक्तदान करून मोलाचे सहकार्य केले.

हे संपूर्ण रक्तदान शिबिर यशस्वी करण्यासाठी राष्ट्रीय सेवा योजनेचे सहायक कार्यक्रम अधिकारी डॉ. प्रविण केचे, महिला कार्यक्रम अधिकारी डॉ. पूनम गहुकर व संपूर्ण राष्ट्रीय सेवा योजना, राष्ट्रीय छात्र सेना चे स्वयंसेवक यांनी अथक परिश्रम घेतले.

9970337991 | 7020510418
सर्वज्ञ ईलेक्ट्रॉनिक्स ॲन्ड होम अप्लायंसेस
LG SAMSUNG Haier Godrej SONY INTEX BLUE STAR HAVELLS ZEBRONICS oppo vivo mi
सोनार लाईन, देवळी, अचलपूर सिटी, जि. अमरावती | फायनान्स उपलब्ध : BAJAJ FINSERV TVS CREDIT HDFC BANK Pine Labs

आपल्या शहरातील प्रत्येक बातमी
SOCIAL MEDIA EDITION
अध्ययन समाचार
आता रोज रहा अपडेट!
संपादक : जितेंद्र रोडे
"अखंड यशाने आपल्या जीवनाची केवळ एकच बाजू कळजे, दुसरी बाजू कळण्यासाठी अपयश हे जरुरी असते"
कार्यालय : ब्राम्हणसभा कॉलनी, डॉ. गजभे यांच्या दवाखान्या समोर, लाकुड बाजार, परतवाडा. जि. अमरावती 444 805
भ्रमणध्वनी : 9422158005 | दूरध्वनी : 07223-222005
jitendrarode77@gmail.com | Adhayayn Samachar
बुधवार दि. २ फेब्रुवारी २०२२

राष्ट्रीय सेवा योजना व इतिहास विभाग यांचा संयुक्त उपक्रम

## आदर्श महाविद्यालयामध्ये हुतात्मा दिन सोहळा संपन्न

था.रेल्वे दि. २ | प्रज्योत पहाडे



संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती संलग्नित धामणगाव एज्युकेशन सोसायटी द्वारा संचालित स्थानिक आदर्श विज्ञान, ज.भा. कला व बिर्ला वाणिज्य महाविद्यालयात प्राचार्य डॉ. योगेंद्र गांडोळे यांच्या मार्गदर्शखाली राष्ट्रीय सेवा योजना व इतिहास विभागाद्वारे आयोजित राष्ट्रीय हुतात्मा दिन व महात्मा गांधी पुण्यतिथी निमित्त आदरांजली सोहळा संपन्न झाला.

३० जानेवारी हा दिवस राष्ट्रीय हुतात्मा दिन म्हणून संपूर्ण देशात साजरा करण्यात येतो. महाविद्यालयाला प्राप्त शासकिय परिपत्रकानुसार देशाच्या स्वातंत्र्यासाठी प्राणार्पण केलेल्या हुतात्म्यांच्या स्मरणार्थ आदर व्यक्त करण्यासाठी महाविद्यालयात रविवार दिनांक ३० जानेवारी २०२२ रोजी प्राचार्य डॉ. योगेंद्र गांडोळे यांच्या अध्यक्षतेखाली शिक्षक- शिक्षकेत्तर बंधु बघिनी यांचे प्रमुख उपस्थितित ०२ मिनिटे मौन (स्तब्धता) पाळून त्यांना आदरांजली वाहण्यात आली.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन इतिहास विभाग प्रमुख प्रा. डॉ. किशोर बारापात्रे यांनी केले. कार्यक्रमाची रूपरेषा व आयोजनाचा हेतू त्यांनी सांगीतला. कार्यक्रमाची कार्यवाही राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी प्रा. श्रीकांत पाटील यांनी केली. दिप प्रज्वलन व महात्मा गांधी यांच्या प्रतिमेला हार अर्पण सोहळ्यांनंतर त्यांच्या पुण्यतिथी निमित्त आदरांजली अर्पण करण्यात आली.

कार्यक्रमाला प्राध्यापक डॉ. माधुरी कोपुलवार, प्रा. डॉ. संजय पाटील, प्रा.डॉ. सूर्यकांत रोडगे, प्रा. डॉ. दीपक शृंगारे, प्रा.डॉ. अमोल बंड, प्रा. डॉ. जितेंद्र बारूळकर, डॉ. फुरकान पठान, डॉ. माया मावळे, डॉ. विष्णू सदाफळे, वसंत तायडे, निलेश किरसान, नवीन शर्मा, नंदकिशोर यादव, भगत, गुणवंत कुमरे, डॉ. निलेश सोनुने, प्रा. जितेंद्र सुर्यवंशी, डॉ. ओबेद कुरेशी, डॉ. श्वेता शर्मा तसेच अन्य शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी व रा. से. यो. चे विद्यार्थी मोठ्या संखेने उपस्थित होते.

प्रोप्रा. सुनिल ध. खानझोडे
9960668238
खानझोडे फेब्रिकेशन ॲन्ड स्टील मटेरियल
YouTube #Khanzode Still Fabrication
स्टील रेलींग | ग्लास रेलींग | मॉड्युलर किचन | झुला | स्टील फर्निचर | ग्रिल | गेट
लाकुड बाजार, अचलपूर रोड, परतवाडा | 8793602643 | 8329766147

## आदर्श महाविद्यालय में शहीद दिवस मनाया

### दो मिनिट मौन रखकर महात्मा गांधी को आदरांजलि



संवाददाता, 1 फरवरी

धामणगांव रेलवे- संत गाड़गेबाबा अमरावती विद्यापीठ से संलग्न तथा धामणगांव एज्युकेशन सोसाइटी द्वारा संचालित स्थानीय आदर्श विज्ञान कला व वाणिज्य महाविद्यालय में राष्ट्रीय शहीद दिवस व महात्मा गांधी की पुण्यतिथि मनाई गई. प्राचार्य डॉ. योगेंद्र गांडोले के मार्गदर्शन में 30 जनवरी को 2 मिनट मौन रखकर महात्मा गांधी को आदरांजलि अर्पित की गई. दीप प्रज्वलन व गांधीजी की प्रतिमा को माल्यार्पण किया गया. कार्यक्रम में प्रा.डॉ. किशोर बारापात्रे, प्रा.डॉ. माधुरी कोपुलवार, प्रा.डॉ. संजय पाटिल, प्रा.डॉ. सूर्यकांत रोड़गे, प्रा.डॉ. अमोल बंड, प्रा.डॉ. जीतेंद्र बारुलकर, प्रा.डॉ. फुरकान पठान, प्रा.डॉ. माया मावले, प्रा.डॉ. विष्णु सदाफले, प्रा.डॉ. ओबेद कुरेशी, प्रा.डॉ. श्वेता वर्मा, प्रा. श्रीकांत पाटिल व अन्य प्राध्यापक तथा छात्र उपस्थित थे.

## आदर्श महाविद्यालयात हुतात्मा दिन

रासेयो व इतिहास विभाग यांचा संयुक्त उपक्रम



धामणगाव रेल्वे, (वा.). धामणगाव एज्युकेशन सोसायटी द्वारा संचालित स्थानिक आदर्श विज्ञान, ज. भा. कला व बिर्ला वाणिज्य महाविद्यालयात प्राचार्य डॉ. योगेंद्र गांडोळे यांच्या मार्गदर्शखाली राष्ट्रीय सेवा योजना व इतिहास विभागाद्वारे राष्ट्रीय हुतात्मा दिन व महात्मा गांधी पुण्यतिथी कार्यक्रम पार पडला. प्राचार्य डॉ. योगेंद्र गांडोळे यांच्या अध्यक्षतेखाली शिक्षक-शिक्षकेत्तर कर्मचार्यांनी 2 मिनिटे मौन (स्तब्धता) पाळून महात्मा गांधी यांना आदरांजली वाहिली. संचालन इतिहास विभाग प्रमुख प्रा. डॉ. किशोर बारापात्रे यांनी केले. राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी प्रा. श्रीकांत पाटील यांनी केली. कार्यक्रमाला प्रा. डॉ. माधुरी कोपुलवार, प्रा. डॉ. संजय पाटील, प्रा. डॉ. सूर्यकांत रोडगे, प्रा. डॉ. दीपक शृंगारे, प्रा. डॉ. अमोल बंड, प्रा. डॉ. जितेंद्र बारूळकर, डॉ. फुरकान पठान, डॉ. माया मावळे, डॉ. विष्णू सदाफळे, वसंत तायडे, निलेश किरसान, नवीन शर्मा, नंदकिशोर यादव, भगत, गुणवंत कुमरे, डॉ. निलेश सोनुने, प्रा. जितेंद्र सूर्यवंशी, डॉ. ओबेद कुरेशी, डॉ. श्वेता शर्मा तसेच अन्य शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी व रासेयोचे विद्यार्थी उपस्थित होते.

मानकी
तुकडोजी म
वणी (वा.)
येथे अखिल
भजन मंडळ
ग्रामवासीयां
तुकडोजी
महोत्सवानि
कार्यक्रमाचे
आले हो
जानेवारीला
तुकडोजी
पुतळ्याज
सभापती
हस्ते घटस
गावकऱ्यां
येऊन गाव
मोलाचा
गावकऱ्यां
कैलास
नानाजी
पोटे, यां
मंडळ उप

तरुण भारत
Paschim Vidarbha | 2022-02-08 | Page- 9
epaper.tarunbharat.net

# आदर्श महाविद्यालयात ११०० सूर्यनमस्कार



सूर्यनमस्कार घालताना विद्यार्थी

◆ **धामणगाव रेल्वे, ७ फेब्रुवारी**

भारतात वसंत पंचमीनिमित्त सूर्यनमस्कार व आरोग्य विषयक कर्म करण्याची परंपरा प्रचलित आहे. त्यालाच अनुसरून व भारतीय स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवाच्या अनुषंगाने संपूर्ण देशभर ७५ कोटी सूर्यनमस्कार करण्याचा संकल्प समाजातील विविध आरोग्यसंबंधी संघटनांनी केलेला आहे. त्याचाच एक भाग म्हणून धामणगाव एज्युकेशन सोसायटीद्वारा संचालित आदर्श विज्ञान, ज. भा. कला व बिरला वाणिज्य महाविद्यालय येथे शारीरिक शिक्षण व क्रीडा विभाग, सामाजिक दायित्व कक्ष व राष्ट्रीय सेवा योजना अंतर्गत बोधी बुडोकान कराटे असोसिएशन चमू व आदर्श महाविद्यालयातील विद्यार्थी यांच्यासोबत ११०० सूर्यनमस्कार पूर्ण करण्याचा उपक्रम केला गेला.

पूर्वसूचनेप्रमाणे सकाळी ६.३० वाजता सर्व १०० जण सूर्यनमस्कारासाठी सज्ज झाले. सुरुवातीला शारीरिक शिक्षण व क्रीडा विभागाच्या प्रमुखांनी प्रास्ताविक व सूर्यनमस्कार याचे महत्त्व उपस्थितांना समजावून सांगितले. महाविद्यालयाच्या प्रांगणात आधी कुणाल गवारले, प्रतीक पंचबुद्धे, राम बेलोणकर यांनी सूर्यनमस्काराचे प्रात्यक्षिक करून दाखविले व सूर्याच्या १२ नामोच्चाराने प्रत्येकी १२ सूर्यनमस्कार करून शिस्तीत महायज्ञ पार पाडला. काही विद्यार्थी व शिक्षकांनी घरून सूर्यनमस्कार केले व ऑनलाईन प्रतिज्ञा घेतली. याप्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. योगेंद्र गांडोळे यांच्यासह डॉ. माधुरी कोपुलवार क्रीडा विभाग प्रमुख, डॉ. नरेंद्र नागपुरे सामाजिक दायित्व कक्ष समन्वयक, श्रीकांत पाटील राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी, सचिन मून मुख्य कराटे प्रशिक्षक, झामरे सचिव बोधी बुडोकान कराटे असोसिएशन, डॉ. दीपक शृंगारे, डॉ. चिंचमलातपुरे, प्राध्यापिका बिरे, पाठक, कार्तिक, प्रज्वल, शिवा व इतर सर्व विद्यार्थी बांधव उपस्थित होते. ◂(तभा वृत्तसेवा)

Powered by iDocuments

# आदर्श महाविद्यालयात 1100 सूर्यनमस्काराचा महायज्ञ

**स्वातंत्र्यांचा अमृत महोत्सवाच्या निमित्ताने देशभरात 75 कोटी सूर्यनमस्काराचा संकल्प**



**धामणगाव रेल्वे** -भारतात वसंत पंचमी निमित्त सूर्यनमस्कार व आरोग्य विषयक कर्म करण्याची परंपरा प्रचलित आहे. त्यालाच अनुसरून व भारतीय स्वातंत्र्यांचा अमृत महोत्सवाच्या अनुषंगाने संपूर्ण देशभर 75 करो? सूर्यनमस्कार करण्याचा संकल्प समाजातील विविध आरोग्य संबंधी संघटनांनी केलेला आहे.व त्याचाच एक भाग म्हणून धामणगाव एजुकेशन सोसायटी द्वारा संचालित आदर्श विज्ञान, ज.भा. कला व बिरला वाणिज्य महाविद्यालय, धामणगाव रेल्वे येथे शारीरिक शिक्षण व क्रीडा विभाग, सामाजिक दायित्व कक्ष व राष्ट्रीय सेवा योजना अंतर्गत बोधी बुडोकान कराटे असोशिएशन चमू व आदर्श महाविद्यालयातील विद्यार्थी यांच्या सोबत 1100 सूर्यनमस्कार पूर्ण करण्याचा उपक्रम केला गेला. पुर्वसुचनेप्रमाणे सकाळी 6.30 वाजता सर्व 100 जण नियमितपणे वार्म अप करीत कराटे काता करून सूर्यनमस्कार साठी सज्ज झाले. सुरुवातीला शारीरिक शिक्षण व क्रीडा विभागाच्या प्रमुख यानी प्रस्ताविक व सूर्यनमस्कार याचे महत्व उपस्थितांना समजून सांगितले. महाविद्यालयाच्या प्रांगणात आधी कुणाल गवारले, प्रतिक पंचबुद्धे, राम बेलोणकर यांनी सूर्यनमस्काराचे प्रात्यक्षिक करून दाखवीले. व सूर्याच्या 12 नामोच्चाराने प्रत्येकी 12 सूर्यनमस्कार करून शिस्तीत महायज्ञ पर पाडला. काही विद्यार्थी व शिक्षकांनी घरून सूर्यनमस्कार केले व online प्रतिज्ञा घेतली. याप्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ योगेंद्र गांडोळे यांच्यासह डॉ माधुरी कोपुलवार क्रीडा विभाग प्रमुख, डॉ नरेंद्र नागपुरे सामाजिक दायित्व कक्ष समन्वयक, श्रीकांत पाटील राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी, सचिन मून मुख्य कराटे प्रशिक्षक, शिलानंद झामरे, सचिव बोधी बुडोकान कराटे असोशिएशन, डॉ दीपक श्रृंगारे, डॉ चिंचमलातपुरे, प्रा.सौ. बिरे, मैत्रेयी पाठक,कार्तिक,प्रज्वल,शिवा व इतर सर्व विद्यार्थी बांधव तसेच कराटे चमु उपस्थित होते.

विदर्भ मतदार
बहुजनांचा बुलंद आवाज
ग्रामीण अंतरंग

# आदर्श महाविद्यालयात ११०० सूर्यनमस्काराचा महायज्ञ

**अमृत महोत्सवाच्या निमित्ताने सूर्यनमस्काराचा संकल्प**



**धामणगाव रेल्वे (वार्ताहर):** भारतात वसंत पंचमी निमित्त सूर्यनमस्कार व आरोग्य विषयक कर्म करण्याची परंपरा प्रचलित आहे. त्यालाच अनुसरून व भारतीय स्वातंर्त्याचा अमृत महोत्सवाच्या अनुषंगाने संपूर्ण देशभर ७५ करोड सूर्यनमस्कार करण्याचा संकल्प समाजातील विविध आरोग्य संबंधी संघटनांनी केलेला आहे.व त्याचाच एक भाग म्हणून धामणगाव एजुकेशन सोसायटी द्वारा संचालित आदर्श विज्ञान, ज.भा. कला व बिरला वाणिज्य महाविद्यालय, धामणगाव रेल्वे येथे शारीरिक शिक्षण व क्रीडा विभाग, सामाजिक दायित्व कक्ष व राष्ट्रीय सेवा योजना अंतर्गत बोधी बुडोकान कराटे असोशिएशन चमू व आदर्श महाविद्यालयातील विद्यार्थी यांच्या सोबत ११०० सूर्यनमस्कार पूर्ण करण्याचा उपक्रम केला गेला. पुर्वसुचनेप्रमाणे सकाळी ६.३० वाजता सर्व १०० जण नियमितपणे वार्म अप करीत कराटे काता करून सूर्यनमस्कार साठी सज्ज झाले. सुरुवातीला शारीरिक शिक्षण व क्रीडा विभागाच्या प्रमुख यानी प्रस्ताविक व सूर्यनमस्कार याचे महत्व उपस्थितांना समजून सांगितले. महाविद्यालयाच्या प्रांगणात आधी विशाल, कुणाल गवारले, प्रतिक पंचबुद्धे, राम बेलोणकर यांनी सूर्यनमस्काराचे प्रात्यक्षिक करून दाखवीले. व सूर्याच्या १२ नामोच्चाराने प्रत्येकी १२ सूर्यनमस्कार करून शिस्तीत महायज्ञ पर पाडला. काही विद्यार्थी व शिक्षकांनी घरून सूर्यनमस्कार केले व पश्चळपश प्रतिज्ञा घेतली. याप्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ योगेंद्र गांडोळे यांच्यासह डॉ माधुरी कोपुलवार क्रीडा विभाग प्रमुख, डॉ नरेंद्र नागपुरे सामाजिक दायित्व कक्ष समन्वयक, श्रीकांत प ... ना व ... अ ... मुख्य प्रशि... झामरे, स... बोधी बुडोकान कराटे असोशिएशन, डॉ दीपक शृंगारे, डॉ चिंचमलातपुरे, प्रा.यामिनी बिरे, प्रतिभा नागलवाडे, सचिन चौधरी, मैत्रेयी पाठक, कार्तिक, प्रज्वल,शिवा व इतर सर्व विद्यार्थी बांधव तसेच कराटे चमु उपस्थित होते.

8/12

अध्ययन समाचार
आता रोज रहा अपडेट!
संपादक : जितेंद्र रोडे
शनिवार दि. २७ नोव्हेंबर २०२१

# आदर्श महाविद्यालयामध्ये संविधान दिना निमित्त मतदान जनजागृती कार्यशाळा संपन्न

धा.रेल्वे दि. २७ | प्रज्योत पहाडे

स्थानिक धामणगाव एज्यूकेशन सोसायटी द्वारा संचालित आदर्श महाविद्यालय येथे संविधान दिवस व मतदान जनजागृती मोहीम २०२१ यांचा सुवर्ण योग साधून राष्ट्रीय सेवा योजना व राज्यशास्त्र विभाग द्वारे आयोजित संविधान दिवस व मतदान जनजागृती कार्यशाळा दि. २६ नोव्हेंबर रोजी संपन्न झाली.

या कार्यक्रमाचे अध्यक्षीय स्थान महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. वाय.बी. गांडोळे यांनी व प्रमुख अतिथी व मार्गदर्शक म्हणून धामणगाव तहसील येथील नायब तहसीलदार जगदीश मंडपे यांनी भूषविले. कार्यक्रमाच्या सुरुवातीला भारतीय संविधानाची उद्देशिकेचे वाचन डॉ. पूनम गहुकर महिला रा. से. यो. कार्यक्रम अधिकारी व सर्व उपस्थितांनी केले. या दरम्यान राज्यशास्त्र विभागाचे प्रमुख प्रा. अमोल बंड यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक व मुख्य अतिथी या



परिचय देऊन आपल्या विशिष्ट भाषण शैली ने संविधानाची रचना, महत्व आणि सामान्य नागरिकांचे मूलभूत कर्तव्य काय आहे यावर प्रकाश टाकला.

नंतर कार्यशाळेची संपूर्ण धुरा प्रमुख अतिथी व मार्गदर्शक म्हणून आलेले जगदीश मंडपे यांनी सांभाळली आणि भारतीय लोकशाहीमध्ये मतदान प्रक्रियेचे काय महत्व आहे. ते सर्व उपस्थितांना पटून दिले. सभागृहामध्ये उपस्थित नवीन मतदान विद्यार्थी यांना मतदानाचा हक्क व मतदाराचे मुख्य कर्तव्ये या बद्दल सखोल मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे अध्यक्षीय भाषण महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. वाय.बी. गांडोळे यांनी केले व भारताचे संविधान आणि मतदान प्रक्रिया याचे महत्व सांगून सर्व उपस्थितांचे मार्गदर्शन केले. कु. वैष्णवी ठाकरे बी.कॉम भाग ३ व दीपक पचारे बी.कॉम भाग ३ या विद्यार्थ्यांनी राष्ट्रीय सेवा योजना अकोला द्वारे आयोजित विद्यापीठ स्तरीय जलसंधारण प्रतिकृती स्पर्धे मध्ये आदर्श महाविद्यालयाचे प्रतिनिधित्व केले या बद्दल त्यांचा प्रमुख अतिथीच्या हस्ते विशेष सत्कार घेण्यात आला.

या कार्यक्रमाला महाविद्यालयातील सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी व नवीन मतदान विद्यार्थी यांनी उपस्थिति दर्शविली. या संपूर्ण कार्यशाळेचे सूत्रसंचालन राष्ट्रीय सेवा योजने च्या स्वयंसेविका कु. भैरवी गांडोळे व कु. साक्षी माळोदे यांनी केले व आभार प्रदर्शन कु. कल्याणी ठाकरे हिने केले. या संपूर्ण कार्यशाळेच्या यशस्विते करिता राष्ट्रीय सेवा योजनेच्या सुवर्णा वंजारी, साक्षी गोडबोले, ऋषभ ठाकरे, पूनम कुरटकर, चंचल खोत, सिमरन तुळसकर, यश सोटे, लाभांषु, प्रज्वल आरेकर, संस्कृती माळोदे, साक्षी गोडबोले, अंकिता तायडे, रेणुका वानखेडे, अर्पिता शर्मा, अथर्व गावंडे अशा अनेक स्वयंसेवकांनी प्रत्यक्ष अप्रत्यक्ष पणे अथक परिश्रम घेतले.




साप्ताहिक
परतवाडा टाईम्स
संपादक - नरेश तायवाडे मो. 9552970699 paratwadatimes@gmail.com 27-11-2021

# आदर्श महाविद्यालयामध्ये संविधान दिना निमित्त मतदान जनजागृती कार्यशाळा संपन्न

## राष्ट्रीय सेवा योजना व राज्यशास्त्र विभागाचा संयुक्त उपक्रम

**धामणगाव रेल्वे | सुयोग देशपांडे**

स्थानिक धामणगाव एज्यूकेशन सोसायटी द्वारा संचालित आदर्श महाविद्यालय येथे संविधान दिवस व मतदान जनजागृती मोहीम २०२१ यांचा सुवर्ण योग साधून राष्ट्रीय सेवा योजना व राज्यशास्त्र विभागा द्वारे आयोजित संविधान दिवस व मतदान जनजागृती कार्यशाळा २६/११/२०२१ रोजी संपन्न झाली. या कार्यक्रमाचे अध्यक्ष स्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. वाय. बी. गांडोळे सर तर प्रमुख अतिथी व मार्गदर्शक म्हणून धामणगाव रेल्वे तहसील येथील नायब तहसीलदार श्री जगदीश मंडपे हे उपस्थीत होते. कार्यक्रमाच्या सुरुवातीला भारतीय संविधानाची उद्देशिकेचे वाचन डॉ. पूनम गहुकर महिला रा. से. यो. कार्यक्रम अधिकारी व सर्व उपस्थितांनी केले. या दरम्यान राज्यशास्त्र विभागाचे प्रमुख प्रा. अमोल बंड यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक व मुख्य अतिथिंचा परिचय देऊन आपल्या विशिष्ट भाषण शैली ने संविधानाची रचना, महत्व आणि सामान्य नागरिकांचे मूलभूत



कर्तव्य काय आहे यावर प्रकाश टाकला. नंतर कार्यशाळेची संपूर्ण धुरा प्रमुख अतिथी व मार्गदर्शक म्हणून आलेले श्री जगदीश मंडपे यांनी सांभाळली आणि भारतीय लोकशाहीमध्ये मतदान प्रक्रियेचे काय महत्व आहे ते सर्व उपस्थितांना पटवून दिले. सभागृहामध्ये उपस्थित नवीन मतदार विद्यार्थी यांना मतदानाचा हक्क व मतदाराचे मुख्य कर्तव्ये या बद्दल सखोल मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे अध्यक्षीय भाषण महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. वाय. बी. गांडोळे यांनी केले व भारताचे संविधान आणि मतदान प्रक्रिया याचे महत्व सांगून सर्व उपस्थितांचे मार्गदर्शन केले, या नंतर कु. वैष्णवी ठाकरे व दीपक पचारे या विद्यार्थ्यांनी राष्ट्रीय सेवा योजना अकोला द्वारे आयोजित विद्यापीठ स्तरीय जलसंधारण प्रतिकृती स्पर्धे मध्ये आदर्श महाविद्यालयाचे प्रतिनिधित्व केले या बद्दल त्यांचा प्रमुख अतिथीच्या हस्ते विशेष सत्कार घेण्यात आला. या कार्यक्रमाला महाविद्यालयातील सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी, व नवीन मतदार विद्यार्थी यांनी उपस्थिति दर्शविली. या संपूर्ण कार्यशाळेचे सूत्रसंचालन राष्ट्रीय सेवा योजने च्या स्वयंसेविका कु. भैरवी गांडोळे व कु. साक्षी माळोदे यांनी केले व आभार प्रदर्शन कु. कल्याणी ठाकरे हिने केले. या संपूर्ण कार्यशाळेच्या यशस्विते करिता राष्ट्रीय सेवा योजनेच्या सुवर्ण वंजारी, साक्षी गोडबोले, ऋषभ ठाकरे, पूनम कुरटकर, चंचल खोत, सिमरन तुळसकर, यश सोटे, लाभांषु, प्रज्वल आरेकर, संस्कृती माळोदे, साक्षी गोडबोले, अंकिता तायडे, रेणुका वानखेडे, अर्पिता शर्मा, अथर्व गावंडे अशा अनेक स्वयंसेवकांनी प्रत्यक्ष अप्रत्यक्ष पणे अथक परिश्रम घेतले.




*नेहरू युवा केंद्राचा उपक्रम*

# आदर्श महाविद्यालय येथे रोजगार संधी आणि उदयोजकता विकास कार्यक्रमाला विद्यार्थ्यांचा मोठा सहभाग



***धामणगाव रेल्वे*** *–नेहरू युवा केंद्र अमरावती युवा कार्यक्रम खेळ मंत्रालय भारत सरकार व वाणिज्य विभाग, आदर्श महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने दि.15 फेब्रुवारी रोजी आत्मनिर्भर भारत अतंर्गत युवकांना रोजगारांची विविध संधी प्राप्त व्हावी व त्यांना उद्योजकता विकास व्हावा त्या करिता नेहरू युवा केंद्राचा वतीने आदर्श महाविद्यालय येथे कार्यक्रम घेण्यात आला . कार्यक्रमाला उपस्थित अध्यक्ष म्हणून लाभलेले आदर्श महाविद्यालयचे प्राचार्य डॉ. योगेंद्र गान्डोळे सर व प्रमुख पाहुने म्हणून लाभलेले के. एल . महाविद्यालय, अमरावती च्या प्रा.डॉ. सोनल चांडक व* Industrial Inspector, DIC, Amravati *च्या सौ . निशिदिता जाधव तसेच वाणिज्य विभागाचे विभाग प्रमुख डॉ. आंनद नरांजे मंचावर उपस्थित होते. तसेच कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. रूपेश डहाके यांनी केले व तसेच पाहुन्याचा परिचय प्रा.नितिन सिंघवी* ■ उर्वरित पान २ वर

आपल्या शहरातील प्रत्येक बातमी
अध्ययन समाचार
आता रोज रहा अपडेट!
संपादक : जितेंद्र रोडे
मेळघाट व्याघ्र प्रकल्प
कार्यालय : ब्राम्हणसभा कॉलनी, डॉ. गजभे यांच्या दवाखान्या समोर, लाकुड बाजार, परतवाडा. जि. अमरावती 444 805
भ्रमणध्वनी : 9422158005 दुरध्वनी : 07223-222005
jitendrarode77@gmail.com Adhayayn Samachar
मंगळवार दि. २२ फेब्रुवारी २०२२

### नेहरू युवा केंद्राचा उपक्रम

# आदर्श महाविद्यालय येथे रोज़गार संधी आणि उद्योजकता विकास कार्यक्रमाचे आयोजन

धा.रेल्वे दि. २२ | प्रज्योत पहाडे



नेहरू युवा केन्द्र, अमरावती युवा कार्यक्रम खेळ मंत्रालय भारत सरकार व वाणिज्य विभाग, आदर्श महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने दि. १५ फेब्रुवारी रोजी 'आत्मनिर्भर भारत' अतंर्गत युवकांना रोजगारांची विविध संधी प्राप्त व्हावी व त्यांना उद्योजकता विकास व्हावा त्या करिता नेहरू युवा केंद्राचा वतीने आदर्श महाविद्यालय येथे कार्यक्रम घेण्यात आला.

कार्यक्रमाला उपस्थित अध्यक्ष म्हणून लाभलेले आदर्श महाविद्यालयचे प्राचार्य डॉ. योगेंद्र गान्डोळे व प्रमुख पाहुणे म्हणून लाभलेले के. एल. महाविद्यालय, अमरावती च्या प्रा.डॉ. सोनल चांडक व इंडस्ट्रीयल इन्स्पेक्टर, डीआयसी, अमरावती च्या सौ . निशिदिता जाधव तसेच वाणिज्य विभागाचे विभाग प्रमुख डॉ. आनंद नरांजे मंचावर उपस्थित होते. तसेच कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. रूपेश डहाके यांनी केले व तसेच पाहुण्यांचा परिचय प्रा.नितिन सिंघवी यांनी केले. नंतर प्रमुख पाहुण्यांचे मार्गदर्शन व अध्यक्षीय भाषण झाले.

कार्यक्रमाच्या यशस्विते करिता प्रा.डॉ. नरेंद्र नागपुरे व वाणिज्य विभागाचे विद्यार्थि व धामंणगाव तालुक्यातील स्वयंसेविका समीक्षा वडुरकर व इतर विभागाचे विद्यार्थी व शिक्षक मोठ्या संख्येने उपस्थित होते.




आपल्या शहरातील प्रत्येक बातमी
अध्ययन समाचार
आता रोज रहा अपडेट!
संपादक : जितेंद्र रोडे
आज जागतिक मुद्रण दिन
कार्यालय : ब्राम्हणसभा कॉलनी, डॉ. गजभे यांच्या दवाखान्या समोर, लाकुड बाजार, परतवाडा. जि. अमरावती 444 805
भ्रमणध्वनी : 9422158005 दुरध्वनी : 07223-222005
jitendrarode77@gmail.com Adhayayn Samachar
गुरुवार दि. २४ फेब्रुवारी २०२२

# आदर्श महाविद्यालयामध्ये शिवजयंती कार्यक्रम थाटात संपन्न

धा.रेल्वे दि. २४ | प्रज्योत पहाडे



दि. २२ फेब्रुवारी रोजी आदर्श महाविद्यालय धामणगाव येथे राष्ट्रीय सेवा योजना चमू च्या वतीने शिव जयंती महोत्सव २०२२ साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाला अध्यक्ष म्हणून महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. वाय. बी. गांडोळे हे लाभले व प्रमुख अतिथी म्हणून आदर्श महाविद्यालयाचे वाणिज्य विभागाचे सहाय्यक प्राध्यापक, रा.से.यो. सल्लागार मंडळ सदस्य व रासेयो माजी कार्यक्रम अधिकारी डॉ. नरेंद्र नागपुरे उपस्थित होते. कार्यक्रमा दरम्यान रासेयो स्वयंसेवकांनी आपले सादरीकरण केले.

शिवजयंती निमित्त शुभांषु जाधव या विद्यार्थ्याने छत्रपती शिवाजी महाराज यांची वेशभूषा परिधान केली होती. सोबतच आई जिजाऊच्या भूमिकेत कु. चंचल खोत, सईबाई च्या भूमिकेत कु. सिमरन तुळसकर व मावळे कार्तिक पातालबंसी, लाभांषु जाधव हे होते.

या दरम्यान कु. प्रिया हिवरकर हिने "मी जिजाऊ बोलतेय" हा आत्मवृत्त एकपात्री प्रयोग सादर केला. तिचा अंगावर शहारे आणणारा प्रयोग बघून उपस्थितांनी तिचे कौतुक केले. कु. उन्नती मेश्राम हिने शिवबाचे वर्णन अतिशय परखड शब्दात मांडून आजच्या तरुण वर्गाला व्यसन मुक्त होऊन, शिवबाचे नाव घेण्याची तयारी नव युवकाची असायला पाहिजे असे आवाहन केले. कु. साक्षी कोरडे हिने शिवाजीचा प्रताप आपल्या भाषणातून प्रकट केला. अध्यक्षीय भाषणामध्ये आदरणीय प्राचार्य डॉ. वाय. बी. गांडोळे यांनी सांगीतले कि "जेव्हा जेव्हा समाजाचं शोषण होते तेव्हा -तेव्हा त्यांचा रक्षणार्थ महान शूर वीरांचा जन्म होत असतो." अशा प्रकारे विद्यार्थ्यांचे मार्गदर्शन केले.

कार्यक्रमाला लाभलेले प्रमुख अतिथी माजी रासेयो कार्यक्रम अधिकारी व वाणिज्य विभागाचे सहा. प्रा. डॉ. नरेंद्र नागपुरे यांनी आजच्या समाजाला दिशा दाखविण्यासाठी शिवाजी महाराजांचे विचार केवळ जयंती व घोषणाबाजी करून नव्हे, तर शिवाजी महाराजांचे खरे समाजोपयोगी मावळे बना, असे आवाहन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कु. साक्षी गोडबोले आणि कु. संस्कृती मंडाले हिने केले. कार्यक्रमाचे संपूर्ण नियोजन रासेयो चे प्रमुख कार्यक्रम अधिकारी प्रा. श्रीकांत पाटील, सहा. कार्यक्रम अधिकारी डॉ. प्रवीण केचे व महिला सहा. कार्यक्रम अधिकारी डॉ. पूनम गहुकर यांनी केले. महाविद्यालयाचे शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी वर्ग यांची कार्यक्रमाला आवर्जून उपस्थिति लाभली. रा. से. यो. सर्व स्वयंसेवकांनी अथक परिश्रम घेऊन कार्यक्रमाचे उत्तम नियोजन केले. कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन कु. सुवर्णा वंजारी हिने केले.

आपल्या शहरातील प्रत्येक बातमी
अध्ययन समाचार
आता रोज रहा अपडेट!
संपादक : जितेंद्र रोडे
महाशिवरात्री निमित्त हार्दिक शुभेच्छा!
कार्यालय : ब्राम्हणसभा कॉलनी, डॉ. गजभे यांच्या दवाखान्या समोर, लाकुड बाजार, परतवाडा. जि. अमरावती 444 805
भ्रमणध्वनी : 9422158005 दुरध्वनी : 07223-222005
jitendrarode77@gmail.com Adhayayn Samachar
मंगळवार दि. १ मार्च २०२२

# आदर्श महाविद्यालयामध्ये राष्ट्रीय विज्ञान दिन संपन्न

धा.रेल्वे दि. १ | प्रज्योत पहाडे



स्थानिक आदर्श विज्ञान, ज. भा. कला व बिर्ला वाणिज्य महाविद्यालयामध्ये राष्ट्रीय विज्ञान दिन : २०२२ "शाश्वत भविष्यासाठी विज्ञान आणि तंत्रज्ञानातिल एकात्मिक दृष्टीकोण" या आशयावर डॉ.सचिन मनोहरे, समन्वयक, विज्ञान संघटना यांच्या मार्गदर्शनात अतिशय उत्साहात साजरा करण्यात आला.

या वर्षी दि. २६ फेब्रुवारी रोजी तालुका स्तरीय विज्ञान प्रदर्शनीचे आयोजन करण्यात आले ज्यामधे स्थानिक सेफला कनिष्ठ महाविद्यालय तथा हिराबाई गोयंका विद्यालय आणि आदर्श महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी वैज्ञानिक प्रयोगावर आधारित उत्कृष्ठ अश्या प्रतिमा/प्रतिकृती सादर केल्या. सदर विज्ञान प्रदर्शनीचे उद्घाटन महाविद्यालयचे प्राचार्य डॉ. योगेंद्र गांडोळे यांच्या हस्ते करण्यात आले. प्रदर्शनिमध्ये समविष्ट प्रतिकृतींच्या मूल्यांकनासाठी परीक्षक म्हणून डॉ. संपदा पाथरकर, डॉ. अमोल ठाकरे श्री राजर्षी शाहू विज्ञान महाविद्यालय, चांदूर रेल्वे तथा डॉ. विष्णु सदाफळे, संदीप पेंदाम, डॉ. हर्षल मुंगसे, डॉ. श्वेता शर्मा आदर्श महाविद्यालय धामणगाव रेल्वे हे उपस्थित होते. सदर स्पर्धा ही दोन गटात घेण्यात आली. गट क्र. १ ही इयत्ता ८ वी ते इयत्ता १२ वी साठी आणि गट क्र. २ ही स्नातक तथा पारंगत या विद्यार्थ्यांसाठी आयोजित करण्यात आली. गट क्र. १ मध्ये प्रथम क्रमांक ची. तेजस लांजेवर आदर्शा महाविद्यालय, धामनगाव रेल्वे, द्वितीय क्रमांक कु. रिया दिघडे, हिराबाई गोयंका कन्या विद्यालय तथा तृतीय क्रमांक कु. राजलक्ष्मी फुलडले सेफला विद्यालय, धामणगाव यांनी पटकविला. वरिस्ठ गटामध्ये प्रथम क्रमांक सयुक्तिकरीत्या कु. समीक्षा ठाकरे व गायत्री निकम, द्वितीय क्रमांक सयुक्तिकरीत्या कु. आस्था वासनिक, कु. सेजल आरेकर, कु. निकिता करांगले तथा तृतीय क्रमांक सयुक्तिकरीत्या कु. भैरवी गांडोळे, कु. साक्षी माळोदे आदर्श महाविद्यालय, धामनगाव रेल्वे यांनी पटकविला

दि. २८ फेब्रुवारी रोजी "शाश्वत भविष्यासाठी विज्ञान आणि तंत्रज्ञानातिल एकात्मिक दृष्टीकोन" या विषयवार माननीय डॉ. संजय सोमकुवर, सहयोगी प्राध्यापक, कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, किरण नगर, अमरावती यांनी समर्पक असे मार्गदर्शन विद्यार्थ्यांना केले. सदर कार्यक्रमासाठी महाविद्यालयचे प्राचार्य डॉ. योगेंद्र गांडोळे हे अध्यक्ष म्हणून उपस्थित होते. सदर कार्यक्रमाचे संचालन कु. श्वेता काळे तर आभार प्रदर्शन प्रा. जितेंद्र सूर्यवंशी यांनी केले. उपरोक्त कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी महाविद्यालयातील डॉ. सचिन मनोहरे, समन्वयक, विज्ञान संघटना, सर्व प्राध्यापकवृंद, शिक्षकेत्तर कर्मचारी तथा प्राणिशास्त्र विभागातील सर्व विद्यार्थ्यांनी अथक परिश्रम घेतले.




# आदर्श महाविद्यालयामध्ये राष्ट्रीय विज्ञान दिन : 2022 संपन्न



**धामणगाव रेल्वे :** स्थानिक आदर्श विज्ञान, ज. भा. कला व बिर्ला वाणिज्य महाविद्यालयामध्ये राष्ट्रीय विज्ञान दिन = 2022 शाश्वत भविष्यासाठी विज्ञान आणि तंत्रज्ञानातिल एकात्मिक दृष्टीकोण या आशयावर डॉ. सचिन मनोहरे, समन्वयक, विज्ञान संघटना यांच्या मार्गदर्शनात अतिशय उत्साहात साजरा करण्यात आला. या वर्षी दिनांक 26.02.2022 रोजी तालुका स्तरीय विज्ञान प्रदर्शनीचे आयोजन करण्यात आले ज्यामधे स्थानिक सेफला कनिष्ठ महाविद्यालय तथा हिराबाई गोयंका विद्यालय आणि आदर्श महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी वैज्ञानिक प्रयोगावर आधारित उत्कृष्ठ अश्या प्रतिमा / प्रतिकृती सादर केल्या. सदर विज्ञान प्रदर्शनीचे उद्घाटन महाविद्यालयचे प्राचार्य डॉ. योगेंद्र गांडोळे यांच्या हस्ते करण्यात आले. प्रदर्शनिमध्ये समविस्ट प्रतिकृतींच्या मूल्याकणासाठी परीक्षक म्हणून डॉ. संपदा पाथरकर, डॉ. अमोल ठाकरे श्री राजर्षी शाहू विज्ञान महाविद्यालय, चांदूर रेल्वे तथा डॉ. विष्णु सदाफळे, श्री. संदीप पेंदाम, डॉ. हर्षल मुंगसे, डॉ. श्वेता शर्मा आदर्श महाविद्यालय धामनगाव रेल्वे हे उपस्थित होते. सदर स्पर्धा ही दोन गटात घेण्यात आली. गट क्र. 1 ही इयत्ता 8 वी ते इयत्ता 12 वी साठी आणि गट क्र. 2 ही स्नातक तथा पारंगत या विद्यार्थ्यांसाठी आयोजित करण्यात आली. गट क्र. 1 मध्ये प्रथम क्रमांक ची. तेजस लांजेवर आदर्शा महाविद्यालय, धामनगाव रेल्वे, द्वितीय क्रमांक कु. रिया दिघडे, हिराबाई गोयंका कन्या विद्यालय तथा तृतीय क्रमांक कु. राजलक्ष्मी फुलडले सेफला विद्यालय, धामनगाव यांनी पटकविला. वरिस्ठ गटामध्ये प्रथम क्रमांक सयुक्तिकरीत्या कु. समीक्षा ठाकरे व गायत्री निकम, द्वितीय क्रमांक सयुक्तिकरीत्या कु. आस्था वासनिक, कु. सेजल आरेकर, कु. निकिता करांगले तथा तृतीय क्रमांक सयुक्तिकरीत्या कु. भैरवी गांडोळे, कु. साक्षी माळोदे आदर्श महाविद्यालय, धामनगाव रेल्वे यांनी पटकविलादिनांक 28.02.2022 रोजी शाश्वत भविष्यासाठी विज्ञान आणि तंत्रज्ञानातिल एकात्मिक दृष्टीकोण या विषयवार माननीय डॉ. संजय सोमकुवर, सहयोगी प्राध्यापक, कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, किरण नगर, अमरावती यांनी समर्पक असे मार्गदर्शन विद्यार्थ्यांना केले. सदर कार्यक्रमासाठी महाविद्यालयचे प्राचार्य डॉ. योगेंद्र गांडोळेहे अध्यक्ष म्हणून उपस्थित होते. सदर कार्यक्रमाचे संचालन कु. श्वेता काळे तर आभार प्रदर्शन प्रा. सूर्यवंशी यांनी केले.. उपरोकत कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी महाविद्यालयातील डॉ. सचिन मनोहरे, समन्वयक, विज्ञान संघटना, सर्व प्राध्यापकवृंद, शिक्षकेत्तर कर्मचारी तथा प्राणिशास्त्र विभागातील सर्व विद्यार्थ्यांनी अथक परिश्रम घेतले.

आता रोज रहा अपडेट!
अध्ययन समाचार
संपादक : जितेंद्र रोडे
दादोजी कोंडदेव
सोमवार दि. ७ मार्च २०२२

# राष्ट्रीय सेवा योजना आदर्श महाविद्यालयाचा श्रम संस्कार शिबिर उद्घाटन सोहळा थाटात संपन्न

धा.रेल्वे दि. ७ | प्रज्योत पहाडे

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, संलग्नित धामणगाव एज्युकेशन सोसायटी द्वारा संचालित आदर्श विज्ञान, ज. भा. कला व बिर्ला वाणिज्य महाविद्यालय धामणगाव रेल्वे येथील राष्ट्रीय सेवा योजना पथकाचा विशेष श्रम संस्कार शिबिर उद्घाटन सोहळा दि. ३ मार्च रोजी मोठ्या उत्साहात संपन्न झाला. स्थानिक धामणगाव तालुक्यातील दत्तक ग्राम वाढोणा (गा.) येथे २ मार्च ते ९ मार्च दरम्यान विशेष श्रम संस्कार शिबीर राबविण्यात येत आहे.

या उद्घाटन सोहळ्याला अध्यक्ष म्हणून धामणगाव एज्युकेशन सोसायटी चे अध्यक्ष ॲड. रमेशचंद्र चांडक तर उद्घाटक म्हणून धामणगाव एज्युकेशन सोसायटी चे सचिव ॲड. आशिष राठी व प्रमुख अतिथी म्हणून डॉ. असीतकुमार पसारी आणि मार्गदर्शक म्हणून महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. वाय. बी. गांडोळे मंचावर उपस्थित होते.



महाविद्यालयीन विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक जाणीव निर्माण व्हावी, महात्मा गांधी, राष्ट्र संत तुकडोजी महाराज, स्वामी विवेकानंद तसेच वैराग्यमूर्ती श्री संत गाडगे महाराज यांचे विचार रुजवावे व विद्यार्थ्यांचा व्यक्तिमत्व विकास घडून यावा या उद्देशाने अशा प्रकारच्या शिबिरांचे आयोजन दर वर्षी होत असते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व परिचय रा. से. यो. कार्यक्रम अधिकारी प्रा. श्रीकांत पाटील यांनी केले.

यानंतर आशिष राठी यांनी श्रम संस्कार शिबिराचे उद्घाटन झाले अशी औपचारिक घोषणा केली. नंतर उद्घाटन सोहळ्याला लाभलेले मार्गदर्शक प्राचार्य डॉ. वाय. बी. गांडोळे यांनी उपस्थित विद्यार्थ्यांना संबोधित करताना महाविद्यालयीन जीवनामध्ये विशेष श्रम संस्कार शिबिराचे महत्व पटवून दिले. कार्यक्रमाला प्रामुख्याने अध्यक्ष म्हणून उपस्थित असलेले धामणगाव एज्युकेशन सोसायटी चे अध्यक्ष ॲड. रमेशचंद्र चांडक यांनी अध्यक्षीय मार्गदर्शन करीत असताना शिबिरातील शिस्त, अनुशासन व व्यवस्थापन याच्या उत्कृष्ट नियोजनाकरिता विद्यार्थ्यांचे कौतुक केले व श्रम संस्कार शिबिराला शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाला गावाचे सरपंच प्रशांत हुडे, उपसरपंच विजय पाटील, पोलीस पाटील रुपेश तीतरे, शाळा व्यवस्थापन समितीच्या अध्यक्षा सौ. सुरेखा हुडे, जि. प. प्राथमिक शाळा वाढोणा येथील मुख्याध्यापिका सौ. प्रतिभा मनोहर तसेच आदर्श महाविद्यालयाचे सर्व प्राध्यापक वृंद, शिक्षकेतर कर्मचारी व सर्व गावकऱ्यांनी उपस्थिती दर्शविली. कार्यक्रमाचे सूत्र संचालन हे रा. से. यो. च्या महिला कार्यक्रम अधिकारी डॉ. पूनम गहुकर तसेच आभार प्रदर्शन डॉ. प्रवीण केचे यांनी केले. अशाप्रकारे विद्यार्थ्यांचा उपस्थीतीत विशेष श्रम संस्कार शिबिराचा उद्घाटन सोहळा दत्तक ग्राम वाढोणा (गा.) येथे अतिशय उत्साहात व शिस्तीत पार पडला.

शिशुओ की हर जरुरत के लिये...
लक्ष्मी बेबी फॅशन
किडस् वेअर | लेडीज गारमेन्ट | होजिअरी
न्यु बॉर्न बेबी आयटम एवं बेबी प्रॉडक्टस्
9422159726 | 8459880982

हिंदुस्थान

# राष्ट्रीय सेवा योजना आदर्श महाविद्यालयाचे श्रम संस्कार शिबिर उद्घाटन सोहळा थाटात संपन्न

## रेन वाटर हार्वेस्टिंग विशेष उपक्रमाचे अतिथींच्या हस्ते भूमिपूजन

धामणगाव रेल्वे दि. ५ : संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, सलग्नित धामणगाव एज्युकेशन सोसायटी द्वारा संचालित आदर्श विज्ञान, ज. भा. कला व बिर्ला वाणिज्य महाविद्यालय धामणगाव रेल्वे येथील राष्ट्रीय सेवा योजना पथकाचा विशेष श्रम संस्कार शिबिर उद्घाटन सोहळा दि. ०३.०३.२०२२ रोजी मोठ्या उत्साहात संपन्न झाला. स्थानिक धामणगाव तालुक्यातील दत्तक ग्राम वाढोणा (गा.) येथे दिनांक ०२/०३/२०२२ ते ०९/०३/२०२२ दरम्यान विशेष श्रम संस्कार शिबीर राबविण्यात येत आहे. या उद्घाटन सोहळ्याला अध्यक्ष म्हणून धामणगाव एज्युकेशन सोसायटी चे अध्यक्ष अ‍ॅड. रमेशचंद्र चांडक तर उद्घाटक म्हणून धामणगाव एज्युकेशन सोसायटी चे सचिव अ‍ॅड. आशीष राठी व प्रमुख अतिथी म्हणून डॉ. असीतकुमार पसारी आणि मार्गदर्शक म्हणून महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. वाय. बी. गांडोळे मंचावर उपस्थित होते. महाविद्यालयीन विद्यार्थ्यांन मध्ये सामाजिक जाणीव निर्माण व्हावी, महात्मा गांधी, राष्ट्र संत तुकडोजी महाराज, स्वामी विवेकानंद तसेच वैराग्यमूर्ती श्री संत गाडगे महाराज



यांचे विचार रुजवावे व विद्यार्थ्यांचा व्यक्तिमत्व विकास घडून यावा या उदेशाने अशा प्रकारच्या शिबिरांचे आयोजन दर वर्षी होत असते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व परिचय रा. से. यो. कार्यक्रम अधिकारी प्रा. श्रीकांत पाटील यांनी केले. यानंतर मा. आशिष राठी यांनी श्रम संस्कार शिबिराचे उद्घाटन झाले अशी औपचारिक घोषणा केली. नंतर उद्घाटन सोहळ्याला लाभलेले मार्गदर्शक मा. प्राचार्य डॉ. वाय. बी. गांडोळे यांनी उपस्थित विद्यार्थ्यांना संबोधित करताना महाविद्यालयीन जीवनामध्ये विशेष श्रम संस्कार शिबिराचे महत्व पटवून दिले. कार्यक्रमाला प्रामुख्याने अध्यक्ष म्हणून उपस्थित असलेले धामणगाव एज्युकेशन सोसायटी चे अध्यक्ष मा. ऍड. रमेशचंद्रजी चांडक यांनी अध्यक्षीय मार्गदर्शन करीत असताना शिबिरातील शिस्त, अनुशासन व व्यवस्थापन याच्या उत्कृष्ट नियोजानाकरिता विद्यार्थ्यांचे कौतुक केले व श्रम संस्कार शिबिराला शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाला गावाचे सरपंच प्रशांत हुडे, उपसरपंच विजय पाटील, पोलीस पाटील रुपेश तीतरे, शाळा व्यवस्थापन समितीच्या अध्यक्षा सौ. सुरेखा हुडे, जि. प. प्राथमिक शाळा वाढोणा येथील मुख्याध्यापिका सौ. प्रतिभा मनोहर तसेच आदर्श महाविद्यालयाचे सर्व प्राध्यापक वृंद, शिक्षकेतर कर्मचारी व सर्व सन्माननीय गावकरी यांनी उपस्थिती दर्शविली. कार्यक्रमाचे सूत्र संचालन हे रा. से. यो. च्या महिला कार्यक्रम अधिकारी डॉ. पूनम गहुकर तसेच आभार प्रदर्शन डॉ. प्रवीण केचे यांनी केले. अशाप्रकारे विद्यार्थ्यांचा उपस्थीतीत विशेष श्रम संस्कार शिबिराचा उद्घाटन सोहळा दत्तक ग्राम वाढोणा (गा.) येथे अतिशय उत्साहात व शिस्तीत पार पडला.